www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद एकनाथ शिंदे...

पान ३ वर....

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ रत्नागिरी विभागाच्या 'मशाल'ला द्वितीय...

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १९९ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, सोमवार, २३ डिसेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# मुख्यमंत्र्यांचा इशारा; तीन महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता



● नागपूर, नितीन देवळेकर :

विधानसभा निवडणुकीत मोठ्या विजयानंतर भारतीय जनता पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी तयारी सुरू केली आहे. विशेष म्हणजे गेल्या पावणेतीन वर्षांपासून राज्यातील अनेक निवडणुका रखडलेल्या आहेत, आणि राजकीय पक्ष २२ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेवरील सुनावणीची वाट पाहत आहेत. तरीदेखील, ४ जानेवारी रोजीच सुनावणी होण्याची शक्यता आहे, आणि तीन महिन्यांत निवडणुका होणार आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबद्दल संकेत दिले आहेत.

नागपुरात भाजप कार्यकर्त्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी फडणवीस यांनी 'मन की बात' मांडली. विधानसभेतील विजयामुळे कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला असून, भाजपसाठी 'फेव्हरेबल' वातावरण तयार झाले आहे. त्यामुळेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपचा विजय साधण्यासाठी पक्षाने तयारी सुरू केली आहे. यासाठीच नवनियुक्त मंत्री, आमदार यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांच्या सदस्य नोंदणी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

विधानसभेतील विजयामुळे सरकार, लोकप्रतिनिधी व पक्षावरील जबाबदारी वाढली आहे. सर्वांनी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. सरकार व जनतेदरम्यान समन्वय साधला जातो, हे महत्त्वाचे आहे. योग्य समन्वय असल्यास काय घडू शकते, हे विधानसभेच्या निकालांवरून स्पष्ट झाले आहे. भाजपच्या कार्यकर्त्यांनी निवडणुकीत एक प्रकारची जादू केली, असे फडणवीस यांनी सांगितले. यावेळी फडणवीस यांनी अप्रत्यक्षपणे लोकप्रतिनिधी व पक्षातील पदाधिकाऱ्यांची शिस्तही सांगितली. पक्ष संघटनेत केवळ ठरावीक कार्यकर्ते आणि जिल्ह्यांचाच पुढाकार असू नये. पान २ वर

# राज्य मंत्रीमंडळाचे खाते वाटप जाहीर

● मुंबई, विशाल कारंडे :

राज्य मंत्रिमंडळांचे खातेवाटप २१ डिसेंबर रोजी जाहीर करण्यात आले आहे. याबाबतची अधिसूचना राज्य शासनाने प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मंत्रीमंडळाचे खाते वाटप पुढील प्रमाणे-

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस : गृह, ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) विधी व न्याय, सामान्य प्रशासन, माहिती व जनसंपर्क, आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग किंवा विषय. उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे : नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)

उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार : वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क.

| क्रमांक | मंत्र्यांचं नाव | खातं |
|---|---|---|
| १ | देवेंद्र फडणवीस | गृहखातं |
| २ | एकनाथ शिंदे | नगरविकास आणि गृहनिर्माण |
| ३ | अजित पवार | अर्थ आणि राज्य उत्पादन शुल्क |
| ४ | चंद्रशेखर बावनकुळे | महसूल |
| ५ | राधाकृष्ण विखे पाटील | जलसंधारण |
| ६ | हसन मुश्रीफ | वैद्यकीय शिक्षण |
| ७ | चंद्रकांत पाटील | उच्च तंत्र शिक्षण |
| ८ | गिरीश महाजन | जलसंपदा |
| ९ | गुलाबराव पाटील | पाणीपुरवठा |
| १० | धनंजय मुंडे | अन्न व नागरी पुरवठा |
| ११ | दादाजी भुसे | शालेय शिक्षण |
| १२ | गणेश नाईक | वनखातं |
| १३ | संजय राठोड | माती व पाणी परीक्षण खात |
| १४ | मंगलप्रभात लोढा | कौशल्य विकास |
| १५ | उदय सामंत | उद्योग व मराठी भाषा |
| १६ | जयकुमार रावल | विपणन |
| १७ | पंकजा मुंडे | पशुसंवर्धन आणि पर्यावरण |
| १८ | अतुल सावे | ओबीसी विकास, दुग्धविकास |
| १९ | अशोक उईके | आदिवासी विकास |
| २० | शंभूराज देसाई | पर्यटन व खाण स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंत्रालय |
| २१ | आशिष शेलार | माहिती व तंत्रज्ञान |
| २२ | दत्तात्रय भरणे | क्रीडा व अल्पसंख्याक विकास |
| २३ | अदिती तटकरे | महिला व बालविकास |
| २४ | शिवेंद्रराजे भोसले | सार्वजनिक बांधकाम |
| २५ | माणिकराव कोकाटे | कृषी |
| २६ | नरहरी झिरवाळ | अन्न व औषध प्रशासन |
| २७ | जयकुमार गोरे | ग्रामविकास आणि पंचायत राज |
| २८ | संजय शिरसाट | सामाजिक न्याय |
| २९ | भरत गोगावले | रोजगार हमी व फलोत्पादन |
| ३० | नितेश राणे | मत्स्य आणि बंदरे |
| ३१ | प्रताप सरनाईक | परिवहन |
| ३२ | बाबासाहेब पाटील | सहकार |
| ३३ | मकरंद पाटील | मदत व पुनर्वसन |
| ३४ | प्रकाश आबिटकर | सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण |
| ३५ | संजय सावकारे | वस्त्रोद्योग |
| ३६ | आकाश फुंडकर | कामगार |
| क्रं. | राज्यमंत्री | राज्यमंत्री |
| १ | माधुरी मिसाळ | सामाजिक न्याय,अल्पसंख्याक विकास वैद्यकीय शिक्षण |
| २ | आशिष जयस्वाल | अर्थ आणि नियोजन आणि विधी व न्याय |
| ३ | इंद्रनील नाईक | उच्च आणि तंत्र शिक्षण आणि आदिवासी विकास |
| ४ | मेघना बोर्डीकर | सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण |
| ५ | योगेश कदम | गृहराज्य शहर |
| ६ | पंकज भोयर | गृह निर्माण |

# भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, कुवेतमधील सर्वोच्च नागरी सन्मान पुरस्काराने सन्मानित !



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या कुवेत दौऱ्यावर गेले आहेत. हा चार दशकांमध्ये भारताच्या कोणत्याही पंतप्रधानाचा कुवेतमध्ये होणारा पहिला दौरा आहे. या दरम्यान, कुवेतचे अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जाबेर अल सबा यांनी पंतप्रधान मोदींना रविवारी 'द ऑर्डर ऑफ मुबारक द ग्रेट' हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान केला. कुवेतमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'गार्ड ऑफ ऑनर'द्वारे भव्य स्वागत करण्यात आले. कुवेतमधील 'बायन' पॅलेसवर पंतप्रधान मोदींना औपचारिक गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला, यावेळी कुवेतचे अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जाबेर अल सबा उपस्थित होते. त्यांनी पंतप्रधान मोदींना 'द ऑर्डर ऑफ मुबारक द ग्रेट' हा पुरस्कार प्रदान केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कुवेतचे अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जाबेर अल सबा यांच्याशी सखोल चर्चा केली. यावेळी भारत-कुवेत संबंधांना आणखी मजबूत करण्यावर आणि विशेषत: व्यापार, गुंतवणूक तसेच ऊर्जा क्षेत्रातील सहकार्यावर चर्चा करण्यात आली.

दरम्यान, शनिवारी (२१ डिसेंबर) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कुवेतमधील गल्फ स्पीक लेबर कॅम्पला भेट देऊन भारतीय कामगारांशी संवाद साधला. या भेटीत मोदींनी सांगितले की, "भारतामध्ये सर्वात स्वस्त इंटरनेट डेटा उपलब्ध आहे आणि जर आपल्याला जगभर किंवा भारतात कुठेही ऑनलाइन बोलायचे असेल, तर त्याचा खर्च अत्यंत कमी आहे. व्हिडीओ कॉन्फरन्सिंग देखील खूप स्वस्त झाले आहे, ज्यामुळे लोक त्यांच्या कुटुंबीयांशी रोज व्हिडीओ कॉलद्वारे संपर्क साधू शकतात."

## शहापूरमधील भयानक घटना, ज्वेलर्सच्या सेल्समनवर गोळीबार

● ठाणे, रोहित जैसवाल :





शनिवार रात्री शहापूरमधील पंडित नाक्यावरील महालक्ष्मी ज्वेलर्समध्ये अज्ञात हल्लेखोरांनी दिनेशकुमार मोनाराम चौधरी यांच्यावर गोळीबार केला. या हल्ल्यात २५ वर्षीय दिनेश चौधरी गंभीरपणे जखमी झाले. पोटात गोळी लागल्यामुळे त्यांना शहापूर उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार देण्यात आले आणि नंतर पुढील उपचारासाठी त्यांना ज्युपिटर हॉस्पिटलला पाठवण्यात आले. दुर्दैवाने, उपचारादरम्यान काल सकाळी त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेच्या निषेधार्थ शहापूर तालुका व्यापारी मंडळाने आज शहापूर बंद पुकारला आणि आरोपींना लवकर अटक करण्याची मागणी केली. शहापूरकरांनी या बंदला उत्कृष्ट प्रतिसाद दिला. घटनेच्या विरोधात शहरातून मूक मोर्चा काढण्यात आला, जो शहापूर पोलीस ठाण्याच्या समोर जाऊन थांबला, आणि त्याठिकाणी मृत दिनेश यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मूक मोर्चात आमदार पांडुरंगजी बरोरा यांनी सहभागी होऊन व्यापारी मंडळासोबत एकत्र येत निषेध व्यक्त केला. यावेळी तालुक्यातील सर्व पक्षीय नेते, पदाधिकारी, व्यापारी आणि नागरिक सहभागी झाले होते.

दरम्यान, गोळीबाराचा हेतू काय होता, याची तपासणी शहापूर पोलिसांनी सुरू केली असून, हल्लेखोरांना पकडण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आले आहे. शनिवारी रात्री घटनास्थळी डॉग स्कॉडच्या मदतीने तपास करण्यात आला.

## विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्राचा समतोल विकास साधणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

● नागपूर, नितीन देवळेकर :





नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात विदर्भ-मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांसह सिंचन, उद्योग, नदीजोड प्रकल्प, पायाभूत सुविधांसारख्या क्षेत्रांबाबत घेण्यात आलेल्या निर्णयांचा लेखाजोखा आणि विकसित, समतोल, सर्वांगिण महाराष्ट्राचा आराखडा मांडण्यात आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या अधिवेशनात विविधांगी चर्चेच्या माध्यमातून १७ विधेयके मंजूर करण्यात आली असून जनसुरक्षा विधेयकाबाबत सर्वांना आपले म्हणणे मांडता येण्यासाठी हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर नागपूरच्या विधिमंडळ परिसरातील हिरवळीवर मुखमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पत्रकार परिषद झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आमच्या सरकारने विदर्भ-मराठवाड्याच्या विकासासह शेतकरी, सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे निर्णय घेतले आहेत. या अधिवेशनात मांडलेल्या ३५ हजार ७८८ कोटींच्या पुरवण्या मागण्यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना यासारख्या योजना यापुढेही सुरु ठेवण्यासाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. आपत्ती बाधीत ५५ हजार संत्रा शेतकऱ्यांना १६५ कोटी रुपये मदत देण्यात आली आहे. पान २ वर

## लग्न सोहळ्यात राज - उद्धव एकत्र. पारिवारिक सोहळ्यातून राजकीय दुरावे कमी होतील का ?

● मुंबई, विशाल पाटील :



राजकारणात एकमेकांचे विरोधक आणि प्रतिस्पर्धी असलेल्या उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे वर्षभरानंतर एकत्र दिसले. एका कौटुंबिक कार्यक्रमात उद्धव आणि राज यांनी एकत्र हजेरी लावली. राजकारणात एकमेकांवर टीका करणाऱ्या या ठाकरे बंधूंमध्ये आज कौटुंबिक कार्यक्रमात संवाद साधला, अशी माहिती मिळाली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भगिनी जैजयवंती ठाकरे-देशपांडे यांच्या मुलाचा विवाह सोहळा आज दादरमध्ये पार पडला. या कार्यक्रमात दोन्ही भाऊ एकत्र आले. यावेळी उद्धव आणि राज एकत्र उभे होते. भाच्याच्या लग्नाला दोन्ही मामांनी हजेरी लावून कौटुंबिक नातेसंबंध टिकवले असल्याचे बोलले जात आहे. पुर्वी, २२ डिसेंबर २०२३ रोजी राज ठाकरे यांच्या भगिनीच्या मुलाच्या साखरपुड्याच्या प्रसंगी उद्धव आणि राज एकत्र आले होते. त्यानंतर आज विवाहाच्या सोहळ्यादरम्यान दोन्ही भाऊ एकत्र आले. यावेळी उद्धव ठाकरे यांच्यासोबत त्यांच्या पत्नी रश्मी ठाकरे देखील उपस्थित होत्या. काही दिवसांपूर्वीच, रश्मी ठाकरे यांच्या बंधू श्रीधर पाटणकर यांच्या लग्नात राज ठाकरे हजर होते आणि रश्मी ठाकरे यांनी त्यांचे स्वागत केले होते.

गेल्या दशकभरापासून राज आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्याच्या चर्चा होतात. २०१४ च्या निवडणुकीत ते एकत्र निवडणूक लढवण्याचा विचार करत होते, मात्र काही कारणांमुळे ते एकत्र आले नाहीत. त्यानंतर, विधानसभा निवडणुकीत शिवसेना ठाकरे गट आणि मनसे यांना पराभवाचा सामना करावा लागला. मराठी माणूस यांच्या हितासाठी दोन्ही पक्षांनी एकत्र यावे, अशी मागणी पुन्हा जोर धरत आहे.



## रिक्षाचालकाकडून अल्पवयीन मुलीचा विनयभंग; फरार रिक्षाचालकाच्या शोधासाठी पथक स्थापन

● वसई, सुचिता सोनावणे:

रिक्षात बसलेल्या १६ वर्षाच्या अल्पवयीन मुलीला निर्जनस्थळी नेऊन एका रिक्षाचालकाने विनयभंग केल्याची धक्कादायक घटना नायगाव मध्ये घडली आहे. माणिकपूर पोलिसांनी या रिक्षाचालकाची ओळख पटवली असून त्याच्या शोधासाठी पथके तयार केली आहेत. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. पीडित मुलगी १६ वर्षांची असून नायगाव मध्ये राहते. शुक्रवारी ती आई बरोबर खरेदीसाठी गेली होती. खरेदी झाल्यानंतर ते दोघे नायगाव स्थानकात आले. आईने काम असल्याने पीडित मुलगी एकटीच घरी जाण्यासाठी निघाली. नायगाव स्थानकाच्या पश्चिमेला उतरून तिने घरी जाण्यासाठई रिक्षा केली. संध्याकाळी ६ च्या सुमारास ती रिक्षात बसली होती. ती रिक्षात एकटीच होती. रिक्षाचालकाने रिक्षा अन्य ठिकाणी वळवली. नेहमीचा रस्ता नसल्याने मुलीला संशय आल्यावर रिक्षाचालकाने उडवाउडवीची उत्तरं दिली. यानंतर त्याने उमेळमान येथील मिठागराच्या निर्जन जागेवर त्याने रिक्षात बिघाड झाल्याचे कारण देत थांबवली. यानंतर मागील बाजूस येऊन त्याने अंधाराचा फायदा घेत पीडित मुलीचा विनयभंग केला.

## संपादकीय

# व्यापारी तूट कशामुळे वाढली ?

२०२२-२३ मध्ये व्यापारी तूट दोन टक्के होती, ती २०२३-२४ मध्ये ०.८०टक्के होती. २०२४-२५ मध्ये चालू खात्यावरील व्यापारी तूट १.३टक्के राहील, असा अंदाज 'यूपीएस सिक्युरिटीज' या संस्थेचा आहे. जगातील दुसरा मोठा सुवर्ण आयातदार देश असलेल्या भारतात नोव्हेंबरमधील सोन्याची मागणी खूपच वाढून, ती २०० टनांवर गेली आहे. दर महिन्याला सरासरी ६८ टनांच्या आसपास असलेली सोने आयात नोव्हेंबरमध्ये तिपटीने वाढली आहे. त्यावर १ हजार ४८० कोटी रुपये खर्च झाले आहेत. म्हणूनच एकीकडे भारतातील व्यापारी मालाची निर्यात 3 हजार २११ कोटी डॉलर्स असताना, आयात मात्र ६ हजार ९९५ कोटी डॉलर्सपर्यंत वाढल्यामुळे, व्यापार तूट ही नोव्हेंबरमध्ये ३ हजार ७८४ कोटी डॉलरपर्यंत वाढली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर किमती भडकत आहेतच, पण देशात सोन्यात गुंतवणूक करण्यासाठी म्हणूनही मागणी फोफावत आहे.

एप्रिल ते नोव्हेंबर २०२४ या चालू आर्थिक वर्षांच्या सात महिन्यांत व्यापारी मालाची निर्यात ही २८ हजार ४३१ कोटी डॉलर म्हणजेच वार्षिक तुलनेत दोन टक्क्यांनी वाढली आहे. याच काळात आयात मात्र वार्षिक तुलनेत आठ टक्क्यांनी भडकून, ती ४८ हजार ६७३ कोटी डॉलरवर जाऊन पोहोचली आहे. त्यामुळे दोहोंतील तफावत या सात महिन्यांत २० हजार २४२ कोटी डॉलर्सवर कडाडली आहे. व्यापारी तूट जास्त वाढणे ही चांगली गोष्ट मानली जात नाही. आंतरराष्ट्रीय पतमापन संस्थाही या बाबीची गंभीर नोंद घेत असतात.

वास्तविक भारताचा परकीय व्यापार वाढत आहे. विदेशी गंगाजळीची घागर भरू लागली आहे. २०२२-२३ मध्ये व्यापारी तूट दोन टक्के होती, ती २०२३-२४ मध्ये ०.८० टक्के राहिली होती. २०२४-२५ मध्ये चालू खात्यावरील व्यापारी तूट १.३ टक्के राहील, असा अंदाज 'यूपीएस सिक्युरिटीज' या संस्थेने व्यक्त केला आहे. एक तर भारत सरकारने प्रयत्न केल्यामुळे खनिज तेल आणि कोळशाची आयात कमी झाली आहे. तसेच केंद्र सरकारने रुपयाच्या माध्यमातून अनेक देशांबरोबर व्यापार सुरू केला आहे. बर्याच देशांसमवेत मुक्त व्यापार करार करण्यात आल्यामुळे निर्यात विकास होऊ लागला आहे. उच्च प्रमाणातील कच्च्या मालाची आयातीकरिता (खास करून ऊर्जा स्रोतांसाठी आणि औषध निर्मितीसाठीच्या मूलभूत घटकांसाठी) भारताला चीनसारख्या देशांवर अवलंबून राहावे लागते. जागतिक बाजारातील चढउतारांमुळे किमतींमध्ये अनियमितता निर्माण होते. म्हणूनच भारताने ऊर्जा स्रोतांच्यासाठी लागणारा माल, सामग्री यांचे देशांतर्गत उत्पादन करण्यावर भर दिला पाहिजे. तसेच आयातीसाठी एकाच देशावर न विसंबता, विविध देशांमधून आयात केली पाहिजे. म्हणजे कमी किमतीत आयात करता येईल. एकीकडे सोन्याची आयात भरमसाठ असतानाच दिलासा देणारी बाब म्हणजे, भारतातील सेवा व्यापार (सर्व्हिस सेक्टर) निर्यातीची घोडदौड सुरू आहे. नोव्हेंबर महिन्यात भारतातून वेगवेगळ्या मालाची जी निर्यात होती, त्यात जवळपास ५ टक्क्यांनी घट झाली आहे. ही निर्यात उलाढाल ३२ अब्ज डॉलरच्या आसपास आहे. भारतात कच्च्या तेलाची आयात फार मोठ्या प्रमाणात होते. जवळपास ८० ते ८५ टक्के हे तेल आपण आयात बाहेरील देशांतून आणतो. या पार्श्वभूमीवर चालू वर्षात प्रथमच भारताची सेवा व्यापार निर्यात नोव्हेंबरमध्ये, अन्य मालाच्या निर्यातीपेक्षा वाढलेली आहे. आयटी सेवांची निर्यात जोमदार आहे आणि याचाच आपल्याला फायदा झाला आहे. गेल्या काही महिन्यांत युद्धजन्य परिस्थितीमुळे तांबड्या समुद्रातून होणार्या जहाज वाहतुकीस फटका बसला होता. परिणामी जहाज वाहतुकीच्या भाड्यांचे दर आकाशाला पोहोचले होते. शिवाय पाश्चात्य देशांकडून मागणी कमी झाली होती. नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये विवाह सोहळे मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे, सोन्याची मागणी वाढते. त्यातच केंद्र सरकारने सोन्याच्या आयातीवरील कर पंधरा टक्क्यांवरून नऊ टक्क्यांवर आणण्याचा निर्णय गेल्याच अर्थसंकल्पात घेतला. वास्तविक सोन्याची आयात ही अनावश्यक आहे. त्यामधून कोणत्याही प्रकारे उत्पादनात चालना मिळत नाही. केवळ चैन आणि उपभोग या पलीकडे त्यातून काहीही साध्य होत नाही. अशावेळी आयात करकपातीचा हा निर्णय बदलणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे व्यापारी तूट वाढत आहे. दुसरीकडे देशाची इलेक्ट्रॉनिक वस्तूंची निर्यात ५४ टक्क्यांनी आणि इंजिनिअरिंग मालाची निर्यात १३ टक्क्यांनी वाढली आहे. या दोन्ही क्षेत्रांत जागतिक बाजारपेठेत भारताने पहिल्यापासूनच आपली नाममुद्रा कोरलेली आहे. केंद्रीय वाणिज्य सचिव सुनील भारतवाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या दहा वर्षांत भारतातून होणार्या मालाची आणि सेवांची निर्यात इतर अनेक देशांच्या तुलनेमध्ये वेगाने वाढत आहे. मुळात जगाची अर्थव्यवस्था दरवर्षी सरासरी तीन ते साडेतीन टक्क्यांनी वाढत असताना, भारतीय अर्थव्यवस्था सात टक्क्यांनीच विस्तारत आहे. त्यामुळे आपली आयातही दिवसेंदिवस वाढणार, यात शंका नाही. कारण वेगवेगळ्या उत्पादनांसाठी लागणारा माल आणि घटक परदेशांतूनही आणावे लागतात. जो माल भारतात वाजवी किमतीत उपलब्ध होत नाही, तो आयात करण्यास काही हरकत नसते. मात्र सेवा निर्यातीतून बहुमोल असे परकीय चलन मिळत असले, तरीदेखील त्यामधून उच्च उत्पन्न गटांचे अधिक हित साधले जाते. कारण आयटी व अन्य सेवा क्षेत्रांतील उच्च वेतनाचे लाभ हे बव्हंशी उच्चवर्गीयांना मिळतात. सुवर्ण अलंकार, वस्त्रप्रावरणे अशा 'गुड्स एक्स्पोर्ट' किंवा मालाच्या निर्यातीस अधिक महत्त्व आहे. कारण या क्षेत्रात प्रचंड प्रमाणात रोजगार तयार होऊन, गरीब व कनिष्ठ मध्यमवर्गीयांचे हित साधले जात असते. त्यामुळे नुसती निर्यात वाढली आहे, म्हणून समाधान न मानता, कोणत्या क्षेत्राची निर्यात वाढत आहे, हे बघणे अधिक महत्त्वाचे आहे !

# शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे !!

राष्ट्रीय शेतकरी दिवस हा हिंदीमध्ये 'किसान दिवस' म्हणूनही ओळखला जातो. हा दिवस भारताचे पाचवे पंतप्रधान श्री चौधरी चरणसिंग यांच्या जयंती स्मरणार्थ देखील साजरा केला जातो. 'शेतकरी दिन' हा शेतकरी आणि शेती यांच्या राष्ट्रीय योगदानाचा उत्सव साजरा करण्यासाठी विविध देशांमध्ये वार्षिक साजरा केला जातो. हे जगभरात वेगवेगळ्या तारखांना पाळले जाते. पहिला शेतकरी दिन २००१ मध्ये साजरा करण्यात आला. त्यावेळी दहाव्या सरकारने चौधरी चरणसिंग यांचे कृषी क्षेत्रातील योगदान आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी त्यांची जयंती 'किसान दिवस' म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून भारतातील दरवर्षी २३ डिसेंबर रोजी हा दिवस 'राष्ट्रीय शेतकरी दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी विविध कार्यक्रम, वादविवाद, परिसंवाद, प्रश्नमंजुषा स्पर्धा, चर्चा, कार्यशाळा, प्रदर्शने, निबंध लेखन स्पर्धा आणि कार्ये आयोजित करून तो साजरा केला जातो. चरणसिंह यांचा जन्म १९०२ मध्ये उत्तर प्रदेशातील मेरठ जिल्ह्यातील नूरपूर येथे एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात झाला. त्यांनी आग्रा विद्यापीठातून १९२३ मध्ये विज्ञान विषयात पदवी आणि १९२५ मध्ये पदव्युत्तर पदवी मिळवली. कायद्याचे प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांनी गाझियाबादमध्ये कायद्याचा सराव सुरू केला आणि १९२९ मध्ये ते मेरठला गेले. ते पहिल्यांदा १९३७ मध्ये छपरौली येथून यूपी विधानसभेवर निवडून आले आणि १९४६, १९५२, १९६२ आणि १९६७ मध्ये त्यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. १९४६मध्ये पंडित गोविंद बल्लभ पंत यांच्या सरकारमध्ये ते संसदीय सचिव झाले आणि महसूल, वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य, न्याय, माहिती इत्यादी विविध खात्यांमध्ये त्यांनी काम केले. जून १९५१ मध्ये त्यांची राज्यात कॅबिनेट मंत्री म्हणून निवड करण्यात आली आणि त्यांच्याकडे न्याय आणि माहिती खात्यांचा कार्यभार देण्यात आला. पुढे त्यांनी १९५२ मध्ये डॉ. संपूर्णानंद यांच्या मंत्रिमंडळात महसूल आणि कृषी मंत्रीपद भूषवले. एप्रिल १९५९ मध्ये त्यांनी राजीनामा दिला तेव्हा ते महसूल आणि परिवहन खात्याची जबाबदारी सांभाळत होते. १९६० मध्ये श्री सी.बी. गुप्ता यांच्या मंत्रालयात ते गृह आणि कृषी मंत्री होते. १९६२-६३ मध्ये चरणसिंग यांनी श्रीमती सुचेता कृपलानी यांच्या मंत्रालयात कृषी आणि वनमंत्री म्हणून काम केले. त्या दशकात पंजाब आणि हरियाणामध्ये विकसित झालेल्या हरितक्रांतीने देशाचे कृषी चित्र बदलले. यामुळे उत्पादकता वाढली आणि त्यामुळे भारत विविध कृषी मालामध्ये स्वयंपूर्ण झाला. 1965 मध्ये त्यांनी कृषी विभाग सोडला आणि १९६६ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा पदभार स्वीकारला. चौधरी चरणसिंह यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्रीपद भूषवलं होतं. यादरम्यान त्यांनी अनेक महत्त्वाची कामं

**प्रविण बागडे**

केली. त्यांच्यामुळेच आज शेतकरी खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला. त्यांनी जमीनदारी रद्द केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी लेखापद पद बनवलं.

त्यानंतर ते उपपंतप्रधान बनले आणि मग २८ जुलै १९७९ ते १४ जानेवारी १९८० पर्यंत त्यांनी अत्यंत अल्प कालावधीसाठी पंतप्रधानपदी विराजमान होऊन पंतप्रधान म्हणून देशाची सेवा केली. चरणसिंह यांनी उत्तर प्रदेशमध्ये विविध पदांवर काम केले आणि प्रशासनातील अकार्यक्षमता, घराणेशाही आणि भ्रष्टाचार सहन न करणारे कठोर कार्यकारी म्हणून नाव कमावले. एक हुशार संसदपटू आणि व्यावहारिक माणूस चरणसिंग हे त्यांच्या वक्तृत्व आणि विश्वासासाठी ओळखले जातात. ते उत्तर प्रदेशातील जमीन सुधारणांचे मुख्य शिल्पकार होते; ग्रामीण कर्जदारांना मोठा दिलासा देणारे विभाग विमोचन विधेयक १९३९ तयार करण्यात आणि अंतिम करण्यात त्यांनी प्रमुख भूमिका बजावली. मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी जमीनधारणा कायदा १९६० आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, ज्याचा उद्देश जमीनधारणेची कमाल मर्यादा कमी करणे आणि राज्यभर एकसमान करणे हे होते. एक समर्पित सार्वजनिक कार्यकर्ते आणि सामाजिक न्यायावर दृढ विश्वास ठेवणारे चरणसिंग यांचे सामर्थ्य मुळात लाखो शेतकऱ्यांच्या विश्वासातून निर्माण झाले. भारत हा मुख्यत: खेड्यांचा देश आहे आणि खेड्यांमध्ये राहणारी बहुसंख्य लोकसंख्या शेतकरी आहे आणि शेती हा त्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत आहे. अजूनही ७०% भारतीय लोकसंख्या शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून आहे. चौधरी चरणसिंह यांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध धोरणांनी भारतातील सर्व शेतकऱ्यांना जमीनदार आणि धनदांडग्यांच्या विरोधात एकत्र केले. भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेल्या 'जय जवान जय किसान' या प्रसिद्ध घोषणेचे त्यांनी पालन केले. ते एक अतिशय यशस्वी लेखक होते आणि त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली ज्यात शेतकरी आणि त्यांच्या समस्यांबद्दल त्यांचे विचार मांडले गेले. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांनी विविध उपायांच्या स्वरूपात खूप प्रयत्न केले. त्यांनी साधे जीवन व्यतीत केले आणि आपला मोकळा वेळ वाचन आणि लेखनात घालवला.

त्यांनी 'जमीनदारीचे निर्मूलन', 'सहकारी शेतीचा क्ष-किरण', 'भारताची गरिबी आणि त्याचे निराकरण', 'शेतकऱ्यांची मालकी किंवा मजुरांसाठी जमीन' आणि 'खालील जमीन ताब्यात घेणे' यासह 'एक निश्चित किमान खाली विभाजनास प्रतिबंध' असे अनेक पुस्तके लिहिल्या. शेतकरी हा भारताचा कणा आहे. चौधरी चरणसिंग अत्यंत साध्या मनाचे व अत्यंत साधे जीवन जगणारे शेतकरी नेते होते, ज्यांनी भारतीय शेतकऱ्यांचे जीवन सुधारण्यासाठी अनेक धोरणे आणली. ते शेतकरी कुटुंबातील होते आणि त्यामुळे भारताचे पंतप्रधान असूनही त्यांनी अतिशय साधे जीवन जगले. आपल्या जीवनातील शेतकऱ्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी आणि त्याची कबुली देण्यासाठी 'राष्ट्रीय शेतकरी दिन' साजरा केला जातो. सर्वांना शेतकरी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

# आर्थिक उदारीकरणाचे जनक : पी व्ही नरसिंहराव

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज पुण्यतिथी. २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली.

मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत कॉंग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारणातून संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथी दिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार दौंड, पुणे**

# माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचे नाशिक, त्र्यंबकेश्वरात देवदर्शन



**नाशिक (सचिन कदम) :** माजी पंतप्रधान आणि जनता दल (धर्मनिरपेक्ष) पक्षाचे नेते एच.डी. देवेगौडा यांनी मुलगा तथा केंद्रीय अवजड उद्योगमंत्री कुमारस्वामी तसेच कुटूंबातील इतर सदस्यांसह शनिवारी पंचवटीतील श्री काळाराम मंदिर आणि त्र्यंबकेश्वर येथे पूजन केले. यावेळी देवेगौडा यांचा कर्नाटकमधील लैंगिक अत्याचार प्रकरणात जामिनावर असणारा दुसरा मुलगा एच.डी. रेवण्णाही उपस्थित होता. याच प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने गेल्या महिन्यात पंतप्रधानांचे नातू, तथा जनता दलाचे (धर्मनिरपेक्ष) निलंबित नेते प्रज्वल रेवण्णा यांचा जामीन अर्ज फेटाळला आहे. माजी पंतप्रधान देवेगौडा हे दोन मुलगे, नातू कन्नड अभिनेता निखील कुमारस्वामी, त्यांची पत्नी रेवती, पणतू अव्यांगदेव यांच्यासह नाशिक आणि त्र्यंबकेश्वर नगरीत दर्शनासाठी आले होते. कुटूंबियांचा हा खासगी दौरा असून कुठलेही राजकीय भाष्य करणार नसल्याचे देवेगौडा यांनी स्पष्ट केले. नाशिक हे प्राचीन तीर्थक्षेत्र आहे. या ठिकाणी श्रीराम, लक्ष्मण आणि सीता हे वास्तव्यास होते. त्यामुळे नाशिकला वेगळे महत्व असून या ठिकाणी भेट देऊन समाधान वाटल्याचे त्यांनी सांगितले. पंचवटीतील श्री काळाराम मंदिर आणि त्र्यंबकेश्वर मंदिरात प्रत्येकी अर्धा तास त्यांनी पूजाविधी केले. कुमारस्वामी हे केंद्रीय मंत्री झाल्यानंतर श्रीरामाच्या दर्शनाला येणार असल्याचे देवेगौडा यांनी म्हटले होते. त्यानुसार त्यांनी दर्शन घेऊन संकल्पपूजन केल्याची माहिती महंत सुधीरदास पुजारी यांनी दिली. नियोजित दौऱ्यात देवेगौडा हे नाशिकरोडच्या मुक्तिधाम मंदिरासही भेट देणार होते. परंतु, विलंब झाल्यामुळे मुक्तिधामला ते गेले नाहीत, असे जनता दलाचे (धर्मनिरपेक्ष) प्रदेशाध्यक्ष नाथा शेवाळे यांनी सांगितले.

पान १ वरून...

## मुख्यमंत्र्यांचा इशारा; तीन...

पदाधिकारी आणि नेत्यांनी भाषण करण्यापेक्षा काम करण्यावर अधिक लक्ष द्यावे, अशी अपेक्षा आहे. अधिवेशनाच्या सहा दिवसांत भेटायला आलेल्या कार्यकर्त्यांपैकी ९५ टक्क्यांनी फक्त फोटो काढले, असे फडणवीस म्हणाले. आता त्यांना कामावर लक्ष केंद्रित करायला हवे. जेव्हा सत्ता असते, तेव्हा लोकप्रतिनिधी आणि संघटनेमध्ये अंतर येते. संघटना हे आपले शस्त्र आहे आणि ते धारदारच असावे लागते. त्यामुळे संघटनेशी योग्य समन्वय राखला पाहिजे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विजय मिळवायचा असेल, तर सदस्यता नोंदणीवर जोर द्यावा लागेल. राज्यात दीड कोटी सदस्य नोंदणी करावी लागेल. प्रत्येक बूथावर १५० सदस्यांची नोंदणी करण्याचे लक्ष ठरवले पाहिजे. ५ जानेवारीला सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जनतेत जाऊन ५० सदस्यांची नोंदणी करायला हवी, ज्यामुळे ५० लाखांचा टप्पा काही तासांत गाठता येईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी रस्त्यांवर उतरून जनतेत काम करायला हवे, फक्त भाषणे देऊन दुसऱ्यांवर काम ढकलण्याची पद्धत योग्य नाही, असे त्यांनी सांगितले. यावेळी मंचावर विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, राष्ट्रीय सहसंगठन महासचिव शिवप्रकाश, सचिव अरविंद मेनन, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री पंकजा मुंडे, रणधीर सावरकर, प्रदेश उपाध्यक्ष संजय भेंडे, ॲड. धर्मपाल मेश्राम आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

## विदर्भ-मराठवाड्याच्या सर्वांगीण...

कापसाला बोनस देण्यात आला आहे. सोयाबीनची विक्रमी खरेदी करण्यात आली असून १२ जानेवारीपर्यंत ही खरेदी सुरु राहणार आहे. बाजारात कापूस आणि तुरीचे खरेदी दर जास्त असल्याने शेतकरी आपला माल बाजारात विकत आहेत. विविध माध्यमांतून पिकांना सहाय्य करण्यासह शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम सरकार करत असल्याचेही त्यांनी सांगितले. नागपूर मेट्रो प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी आशियाई विकास बँकेबरोबर प्रकल्प करार करण्यात आला आहे. या प्रकल्पाला ०.७२ टक्के व्याजदराने २० वर्षांसाठी ३५८६ कोटी रुपये अर्थसहाय्य मिळणार आहे. 'मित्रा' संस्थेच्या माध्यमातून एक हजार लोकसंख्येवरील गावांना कॉंक्रीट रस्त्याने जोडणे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे बळकटीकरण, बांबू अभियान यासारख्या उपक्रमांना देखील आशियाई विकास बँक मदत करणार आहे, अशी माहितीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, गेल्या अडीच वर्षात सर्वसामान्य माणसांच्या आयुष्यात बदल घडविणारे अनेक निर्णय घेतले आहेत. आता आमची जबाबदारी आणखी वाढली असून सर्वसामान्यांच्या-मायभगिनींच्या प्रगतीसाठी, रक्षणासाठी यापुढेही एक टीम म्हणून काम केले जाणार आहे. या अधिवेशनात नागरिकांच्या, राज्याच्या चौफेर विकासाचा संकल्प करण्यात आल्याने हे अधिवेशन यशस्वी झाले आहे. या परिषदेस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री शंभूराज देसाई, संजय राठोड, आशिष जयस्वाल, नितेश राणे आदी उपस्थित होते.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद एकनाथ शिंदे यांनीच स्विकारावे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची इच्छा



**ठाणे (सम्यक कासारे) :** जेव्हापासून एकनाथ शिंदे यांच्याकडे ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री पद आले. तेव्हापासून ठाणे जिल्ह्याला विकासाची नवी झळाळी मिळाली. ठाणे जिल्हा विकासाकडे जाऊ लागला. मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात त्यांनी जिल्ह्याला करोडो रुपयांचा निधी उपलब्ध करून ठाणे जिल्ह्याला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. त्यामुळे ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद एकनाथ शिंदे यांनाच मिळावे अशी इच्छा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली.

पालकमंत्री पदावरून महायुतीमधील तिन्ही पक्षांमध्ये रस्सीखेच सुरू आहे. ठाणे जिल्ह्यात एकनाथ शिंदे, गणेश नाईक आणि प्रताप सरनाईक यांना मंत्रीपद मिळाले आहे. त्यामुळे ठाणे जिल्ह्यात कोणाला पालकमंत्री पद मिळेल यावरून चर्चा सुरू आहे. रविवारी खोपट आगाराच्या पाहाणी वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालकमंत्री पद स्विकारावे अशी इच्छा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली.

जेव्हापासून एकनाथ शिंदे यांच्याकडे ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री पद आले. तेव्हापासून ठाणे जिल्ह्याला विकासाची नवी झळाळी मिळाली. ठाणे जिल्हा विकासाकडे जाऊ लागला. मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात त्यांनी जिल्ह्याला करोडो रुपयांचा निधी उपलब्ध करून ठाणे जिल्ह्याला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. त्यामुळे शिंदे यांनीच ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्विकारावे आणि ठाणे जिल्ह्याचा विकास करावा असे सरनाईक म्हणाले.

### आशागड ग्रामपंचायतीत पत्रकाराला मारहाण…

## दोन सदस्य व ग्रामस्थांविरोधात डहाणू पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**पालघर (सतीश सोनावणे) -** जिल्ह्यांतील डहाणू तालुक्यातील आशागड ग्रामपंचायतीत पत्रकाराला मारहाण करून जातीयवादी शिवीगाळ केल्याप्रकरणी डहाणू पोलीस ठाण्यात दोन सदस्य व एका ग्रामस्थावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.वैभव संदिप रणदिवे अशा या पत्रकाराचे नाव असून दैनिक झुंझार केसरी या वृत्तपत्रातून वृत्तांकन करण्याचे काम वैभव सात्यताने करत असताना दिनांक २० डिसेंबर रोजी आशागड ग्रामपंचायतीत ग्रामसभा सुरू असताना सदर ग्रामपंचायतीचा ग्रामस्थ म्हणून उपस्थित वैभव यांनी सदर ग्रामसेभेत ग्रामसेविका



अश्विनी तांडेल यांच्याकडून कामाचा तपशील मांडत असताना मोबाईल कॅमेऱ्यात चित्रिकरण करणाऱ्या पत्रकार वैभव रणदिवे यास सदस्य कन्हैया उत्तम पवार, सदस्य दिपक मोहिते व ग्रामस्थ ललित उत्तम पवार यांनी वैभव यास पकडून धक्काबुक्की करत चित्रिकरण का करतोस तसेच तू या गावात रहात नाही तूजे इकडे काय काम अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत जातियवादी शिवीगाळ देऊन मारहाण केल्याची घटना घडलेली असून कन्हैया उत्तम पवार, दिपक मोहिते व ललित उत्तम पवार यांच्या विरोधात डहाणू पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५), व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ चे कलम नुसार ३(१)(R), ३(१)(S) तर नागरि हक्क संरक्षण अधिनियम १९५५ कलम नुसार ७(१)(D) गुन्हा दाखल करण्यात आलेला असून डहाणू पोलिसांकडून सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

## कल्याणमध्ये उत्तर भारतीयाला आठ ते दहा जणांच्या टोळक्याकडून लोखंडी रॉड, कोयत्याने मारहाण



**कल्याण (आकाश कांबळे) -** कल्याण पश्चिम भागात अभिजित देशमुख या मराठी माणसाला मारहाण झाल्याची घटना ताजी असतानाच आता एक नवी घटना समोर आली आहे. कल्याण पूर्व भागातील काटेमानवली या ठिकाणी आठ ते दहा जणांच्या टोळीने घरात घुसून मारहाण केली. रमाशंकर दुबे असं मारहाण झालेल्या व्यक्तीचं नाव आहे. कोयता, लोखंडी रॉड, लाकडी दांडक्याने रमाशंकर दुबे घरात घुसून मारहाण करण्यात आली. या प्रकरणी कोळशेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दरम्यान या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

"कल्याणमधील काटेमानवलीत दुबे चाळ नावाच्या भागात रमाशंकर दुबे नावाचे ६० वर्षांचे गृहस्थ राहतात. त्यांचा आणि त्यांच्या चुलत भावाचा गावातील जमिनीवरुन वाद आहे. या वादातून २१ डिसेंबरच्या रात्री रमाशंकर दुबे यांना एका टोळीने लोखंडी रॉड, लाठ्या-काठ्या आणि कोयता घेऊन जात मारहाण केली. तसंच त्यांना शिवीगाळही करण्यात आली. ज्यानंतर कोळशेवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहीता कलम ११८, १९३, १९०, १८९, ३९३ या अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातला जो प्रमुख आरोपी आहे त्याचं नाव रणजीत दुबे आहे. तोदेखील जखमी झाल्याने त्याला रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आलं आहे. तर इतर आरोपींचा शोध आम्ही घेत आहोत." अशी माहिती पोलिसांनी दिली. तसंच लवकरात लवकर आरोपींना पकडण्यात येईल असंही त्यांनी सांगितलं.

# पालिकेचे पाणी पथक स्थापन, आमदारांनी खडसावताच पालिका सक्रिय

**वसई (सुचिता सोनावणे) -** नळ जोडणीतील गैरप्रकार, पाणी वितरणातील अनियमितता आणि त्रुटी आदी समस्या सोडविण्यासाठी वसई विरार महापालिकेने पाणी पथक स्थापन केले आहे. यामध्ये पालिका अभियंता आणि कर्मचारी दर आठवड्यात प्रत्येक प्रभागात जाऊन पाहणी करणार आहेत. आमदार स्नेहा पंडित-दुबे यांनी काही दिवसांपूर्वी आढावा बैठकीत याबाबत खडसावले होते, तसेच अधिवेशनातही हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यामुळे वसई विरार पालिकेने हे पथक तयार केले आहे.




वसई विरार महापालिकेतर्फे शहरातील नागरिकांना सुर्या पाणी प्रकल्प, उसगाव आणि पेल्हार धरणातून दररोज पाणी पुरवठा केला जातो. शहराची व्याप्ती वाढत असून लोकसंख्या वेगाने वाढत आहेत. त्यामुळे पाण्याची मागणी सतत वाढत असते. त्यामुळे टॅंकर लॉबी देखील शहरात सक्रीय आहे. पाण्याची मागणी वाढत असल्याने नळजोडणीत, पाणी वाटपात गैरप्रकार आणि अनियमितता होत असल्याच्या तक्रारी सतत होत असतात. अनेक भागांना अद्याप पाणी मिळालेले नाही. ज्यांना पाणी मिळते ते कमी दाबाने मिळत असल्याने पाणी टंचाईची समस्या कायम भेडसावत असते. यासाठी सर्वांना समान आणि पुरेसे पाणी मिळावे अशी मागणी करण्यात येत होती. या वाढत्या तक्रारी लक्षात घेऊन वसईच्या आमदार स्नेहा पंडित-दुबे यांनी आढावा बैठक घेतली होती. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना खडसावले होते आणि पाणी समिती तयार करण्याची सुचना केली होती. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनातही त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानुसार पालिकेने प्रभागनिहाय पाणी पथक तयार केले आहे. त्यात अभियंता आणि कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

### प्रत्येकाच्या घरात नळ का नाही?

केंद्र शासनाने जलजीवन मिशन अंतर्गत हर घर नल अशी घोषणा केली आहे. मात्र पालिका १० घरांमागे एक नळ (स्टॅंडपोस्ट) देत आहे. प्रत्येकाच्या घराच नळ का नाही असा सवाल आमदार स्नेहा दुबे यांनी केली आहे. चाळींमध्ये दहा घरांमांगे एक नळ देण्याचे धोरण महापालिकेने ठरवले आहे. प्रत्येक घरात नळ द्यायचा असेल तर त्यानुसार ठराव करावा लागेल, असे पालिका अधिकाऱ्यांनी सांगितले. प्रत्येकाच्या घरात नळ नसला तरी प्रत्येकाला पाणी दिले जात असल्याचेही या अधिकाऱ्याने सांगितले.



## भिवंडीच्या गोदामातून नऊ बालकामगारांची सुटका

**भिवंडी (विशाल कारंडे) :** भिवंडीतील नारपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गोदामातून नऊ बालकामगार मुलींची सुटका करण्यात आली आहे. या गोदामामध्ये अल्पवयीन मुलांना कामावर ठेवल्याची घटना भिवंडी तालुक्यातील वेहळे गावातून उघडकीस आली असून सामाजिक संस्थांच्या सक्रियतेमुळे पोलिसांनी छापा टाकून ९ अल्पवयीन मुलींची सुटका केली आहे. याप्रकरणी गोदाम मालक रामा राम सुतार याच्या विरोधात बालकामगार प्रतिबंध कायदा व इतर कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, लोढा अप्पर ठाणे बिल्डिंग टीआरएच्या फ्लॅटमधील सुतार यांचा पॅकेजिंगचा व्यवसाय आहे. त्या ठिकाणी बाल कामगारांकडून काम करून घेतले जात होते. येथील गोदामामध्ये १२ ते १७ वर्षे वयोगटातील अल्पवयीन ९ जणांना इलेक्ट्रॉनिक वस्तू पॅकिंगसाठी ठेवण्यात आल्याचे छाप्या दरम्यान निष्पन्न झाले आहे.

## स्टेट बँक (एसबीआय) मुरबाड शाखे मार्फत मुरबाड मध्ये शेतकरी दिवस उत्साहात साजरा!





**मुरबाड (गणेश बागडे) -** मुरबाड-कल्याण या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या स्टेट बँक मुरबाड येथे बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थित मध्ये शेतकरी हा देशाचा कणा आहे शेतकरी आहे म्हणून देश आहे आपण आहोत ही जाणीव ठेवून देशामध्ये शेतकरी दिन साजरा केला जातो अशाच प्रकारे मुरबाड तालुक्यात भारतीय स्टेट बँकेतर्फे विविध उपक्रमाने व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा दिन मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. आरएम राजेंद्र धिंग्रा, ए जी एम ममता मोहपाता,सीएम हिना कॉंट्रोज,ॐभी विवेक कुमार, मुरबाड शाखा प्रमुख तुषार चव्हाण, प्राजक्ता पवार उपस्थित होते. या कार्यक्रमात शेतकयांसाठी विविध योजना संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. या मध्ये अनेक कृषी सुविधांबद्दल आणि योजना बद्दल माहिती देण्यात आली (Agri Alied Activities, PMPME Agri wearshow Agri Stronge, Agri Refrigeration )२० सारख्या विविध योजनांची माहिती देण्यात आली आदिवासी आश्रम शाळा सासणे यां मध्ये सिएसआर (CSR) फंडामधून मधुन शाळेसाठी संगणक लॅब देण्यात आले संगणक लॅबचे उद्घाटन राजेंद्र धिंग्रा यांचे हास्ते उद्घाटन करण्यात आले. तसेच मुरबाड येथे शेतकऱ्यांना स्टेट बँक (एसबीआय )बँक तर्फे शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या योजनांची माहिती दिली तसेच शेती कर्ज घेतलेल्या सर्व शेतकरी यांचे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या कार्यक्रमासाठी मुरबा तालुक्यातील अनेक शेतकरी खातेधारक व नागरिक उपस्थित होते.

## धोकादायक इमारतींचा पुनर्विकास रखडला



**ठाणे (यश सावंत) :** बाळकूम, कोलशेत, मानपाडा ढोकाळी येथील मूळ सातबारा उताऱ्यातील क्षेत्र आणि नवीन मालमत्ता पत्रकातील नोंदीत मोठी तफावत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे तांत्रिक अडचण निर्माण होऊन यशस्वी नगरसारख्या जुन्या वसाहतीतील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास रखडला आहे. त्यामुळे मूळ सातबारा उताऱ्यातील क्षेत्र आणि मालकी हक्क कायम करून देण्याची मागणी आमदार संजय केळकर यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे केली.

नागपूर येथील विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात आमदार संजय केळकर यांनी ठाणे महापालिकेतील महसुली गावे बाळकूम, कोलशेत, मानपाडा, ढोकाळी येथील मूळ सातबारा उतारा आणि नवीन मालमत्ता पत्रक यात असलेल्या नोंदींची तफावत आणि त्यामुळे जुन्या इमारतींचा रखडलेला पुनर्विकास सभागृहाच्या निदर्शनास आणून दिला. मालमत्ता पत्रकात झालेल्या चुकीच्या नोंदी हा रहिवाशांवर अन्यायच असल्याचे केळकर यांनी स्पष्ट केले. येथील यशस्वी नगरसारख्या गृहसंकुलात ४० ते ५० वर्षे जुन्या इमारती आहेत. त्या धोकादायक झाल्या असून ठाणे महापालिकेने त्या रिकाम्या करण्यासाठी रहिवाशांना नोटीसाही बजावल्या आहेत.

# पदभार स्विकारताच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक एक्शन मोडवर, खोपट आगारातील असुविधेबाबत अधिकाऱ्यांना धारेवर धरले



**ठाणे (रोहित जैसवाल) :** परिवहन मंत्रीपदाचा पदभार स्विकारल्यानंतर प्रताप सरनाईक ॲक्शन मोडवर आल्याचे पाहायला मिळाले. रविवारी दुपारी त्यांनी ठाण्यातील खोपट आगाराला भेट देऊन तेथील असुविधांबाबत अधिकाऱ्यांची कानउघाडणी करत त्यांना धारेवर धरले.

तसेच महिन्याभरात येथे प्रवासी आणि एसटी कर्मचाऱ्यांना सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना केल्या. यापुढे चुकीला क्षमा नाही असेही ते म्हणाले. तत्कालीन मुख्यमंत्री आणि आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फेब्रुवारी महिन्यात आगारातील असुविधांविषयी अधिकाऱ्यांना बजावले होते. त्यानंतरही सुविधा उपलब्ध झाल्या नसल्याने एसटीच्या कारभाराविषयी सरनाईक यांनी नाराजी व्यक्त केली.

खोपट एसटी आगारात फेब्रुवारी महिन्यात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री आणि सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आगाराची पाहणी केली होती. त्यावेळी आगारात मोठ्याप्रमाणात असुविधा आढळून आल्या होत्या. शिंदे यांनी अधिकाऱ्यांना खडसावत येथील असुविधांची दुरुस्ती करण्याचे आदेश दिले होते. प्रताप सरनाईक यांनी परिवहन मंत्री पदाचा पदभार स्विकारला आहे. आगारात सुविधा उपलब्ध झाल्या की नाही याची पाहणी करण्यासाठी सरनाईक अचानक एसटी आगारात शिरले. त्यांनी पाहाणी केली असता, असुविधा कायम असल्याचे दिसून आले. स्वच्छतागृह, स्नानगृहांची अवस्था अत्यंत वाईट आहे. प्रवाशांनाही वेळेत बसगाड्या उपलब्ध होत नाही.

पहिला दिवस असल्याने कारवाईचा हेतू नाही. पण शिस्त असावी. ठाणे आमचे घर आहे. त्यामुळे घरापासून सुरूवात करावी यासाठी या आगाराची पाहाणी केली. भविष्यात राज्यातील इतर आगारांचीही पाहणी करणार आहे असे सरनाईक म्हणाले. या समस्यांचे निराकारण होऊ शकते. भविष्यात चुकीला क्षमा नाही.

## मुरबाड- कल्याण राष्ट्रीय महामार्गावर वर्षभरात ५८ अपघातात, ३६ जण ठार,५८ जण जखमी!

**मुरबाड (विवेक गुंजाळ) -** मुरबाड- कल्याण नगर या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वरील म्हारळ ते माळशेज घाट महामार्गावर गेली वर्षभरात विविध प्रकारचे जवळपास ५८ अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत त्यामध्ये ३६ जणांचा मृत्यू झाला आहे तर ५८ जण गंभीर जखमी झाल्याची माहिती राष्ट्रीय महामार्ग पोलिस केंद्र मुरबाड- माळशेज घाटचे सहायक पोलिस निरीक्षक अनिल विसपुते यांनी दिली आहे.

या घटनेची माहिती मिळताच मुरबाड- माळशेज महामार्ग केंद्र येथील पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी येऊन अपघात यांची माहिती घेऊन त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्याची भूमिका महामार्गावरील पोलिस बजवत आहेत त्यामुळे सध्या देवदूत म्हणून या राष्ट्रीय महामार्गावरील पोलिस काम करत असल्याच्या प्रतिक्रिया वाहनचालक व नागरिकांनी दिली आहे. यामध्ये पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र ठाकूर, चंद्रकांत भोये, पोलीस हवालदार राजेंद्र रसाळ, संजय घुडे, प्रवीण गायकवाड, तसेच पोलीस शिपाई मध्ये कैलास कोकाटे, खंडेराव आव्हाड, शरद पाखरे,



पोलीस हवालदार अमोल पाटील यांच्यासह इतर पोलीस अंमलदार हे सुद्धा सर्वत्र म्हारळ ते माळशेज घाट पर्यंत सतर्क म्हणून काम करत आहे. तसेच जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ दरम्यान घडलेल्या अपघाताची माहिती मुरबाड माळशेज घाट पोलिसांनी दिली आहे.

म्हारळ ते माळशेज घाट पर्यंत ट्राफिक पोलीस चांगली भूमिका बजावून रस्त्यावर घडलेल्या अपघात ग्रस्तांनाचांगली मदत करतात तसेच घाट रस्त्याच्या बाजूच्या गावाकडीची मानसेही मृत्युंजय देवदूत म्हणून काम करत आहेत.

# ‘पुष्पा २’ चित्रपटाची बॉक्स ऑफिसवर अजूनही जोरदार घोडदौड सुरुच



सुकुमार दिग्दर्शित ‘पुष्पा २: द रुल’ चित्रपटाचा सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ पाहायला मिळत आहे. अल्लू अर्जुन, रश्मिका मंदाना आणि फहाद फासिल यांची प्रमुख भूमिका असलेला ‘पुष्पा २: द रुल’ चित्रपट दिवसेंदिवस नवनवीन रेकॉर्ड करत आहे. त्यामुळे सध्या बॉक्स ऑफिसवर पुष्पाची हवा जोरदार आहे, असं म्हणायला काही हरकत नाही. पण, शनिवारी या चित्रपटाने किती कोटींची कमाई केली? जाणून घ्या.

द रुल’ ( Pushpa २ ) चित्रपटाने दुसऱ्या शनिवारी ( १४ डिसेंबर ) ६२.३ कोटींचा व्यवसाय केला होता. यामधील ४६ कोटी हिंदी व्हर्जनने कमावले. तर १३ कोटींची कमाई तेलुगू व्हर्जनने केली होती. सॅकनिल्कच्या रिपोर्टनुसार, तिसऱ्या शनिवारी म्हणजे १७व्या दिवशी ‘पुष्पा २: द रुल’ चित्रपटाने चांगलीच कमाई केली आहे. शनिवारी २५ कोटींचा गल्ला अल्लू अर्जुनच्या चित्रपटाने जमवला आहे. त्यामुळे भारतातील एकूण कमाईचा आकडा १०२९.९ कोटी झाला आहे.

एकूण कमाईच्या आकड्यांमध्ये तेलुगू भाषेतील चित्रपटाने आतापर्यंत ३०२.३५ कोटी, हिंदीमध्ये ६५२.९ कोटी, तमिळमध्ये ५३.४ कोटी, कन्नडमध्ये ७.२४ कोटी आणि मल्याळममध्ये १४.०१ कोटींचा व्यवसाय केला आहे. तर जगभरात ‘पुष्पा २: द रुल’ ( Pushpa २) चित्रपटाने १६०० कोटी रुपये कमावले आहेत.

दरम्यान, ४०० ते ५०० कोटींच्या बजेटमध्ये बनलेला ‘पुष्पा २: द रुल’ (Pushpa २) चित्रपटात अल्लू अर्जुन, रश्मिका मंदाना, फहाद फासिलसह श्रीतेज, अनासुया भारद्वाज, जगदीप प्रताप, जगपति बाबू महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. २०२४ संपण्यापूर्वी ‘पुष्पा २: द रुल’ बरेच रेकॉर्ड करण्याची शक्यता आहे. तसंच आता हॉलीडे, ख्रिसमस आहे, त्यामुळे या चित्रपटाच्या कमाईत मोठी वाढ होणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

‘पुष्पा २: द रुल’ ( Pushpa २ ) चित्रपटाच्या १५ दिवसांच्या कमाईबद्दल बोलायचं झालं तर, पहिल्या दिवशी-१६४.२५ कोटी, दुसऱ्या दिवशी-९३.८ कोटी, तिसऱ्या दिवशी-११९.२५ कोटी, चौथ्या दिवशी ११४१.०५ कोटी, पाचव्या दिवशी-६४.४५ कोटी, सहाव्या दिवशी ५१.५५ कोटी, सातव्या दिवशी-४३.३५ कोटी, आठव्या दिवशी-३७.४५ कोटी अशी पहिल्या आठवड्यात या चित्रपटाने एकूण ७२५.८ कोटींची कमाई केली होती. नवव्या दिवशी-३६.४ कोटी, दहाव्या दिवशी-६३.३ कोटी, अकराव्या दिवशी-७६.६ कोटी, बाराव्या दिवशी-२६.९५ कोटी आणि तेराव्या दिवाशी-२४.३५ कोटी, चौदाव्या दिवशी २०.५५ कोटी, पंधराव्या दिवशी-१७.६५ कोटी अशाप्रकारे दुसऱ्या आठवड्यात ‘पुष्पा २: द रुल’ चित्रपटाने एकूण २६४.८ कोटींची कमाई केली. तसंच सोळाव्या दिवशी १४.३ कोटींचा व्यवसाय सुकुमारच्या चित्रपटाने केला.

# “तो असता तर आयुष्य...”, ‘भाग्य दिले तू मला’ फेम अभिनेत्री वडिलांबद्दल झाली व्यक्त



‘सायकल’ या २०१८ साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण करणारी अभिनेत्री म्हणजे तन्वी मुंडले होय. ‘पाहिले ना मी तुला’ या मालिकेतून तन्वी घराघरांत पोहोचली. या मालिकेतील तिच्या अभिनयामुळे तिचा मोठा चाहतावर्ग निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. याबरोबरच अभिनेत्री ‘भाग्य दिले तू मला’ या मालिकेत प्रमुख भूमिकेत काम करताना दिसली होती. आता एका मुलाखतीत तन्वीने तिच्या वडिलांविषयीच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

अभिनेत्री तन्वी मुंडलेने नुकताच ‘लोकमत फिल्मी’बरोबर संवाद साधला. त्यावेळी अभिनेत्रीने वडिलांविषयी भावना व्यक्त केल्या. तन्वीने म्हटले, “तीन वर्षे झाली, मी तो कप्पा उघडतच नाही. मी त्याला ए बाबाच म्हणायचे. आबू म्हणायचे. माझा जवळचा मित्र होता. तो असता तर आयुष्य खूप वेगळं असतं. माझ्या आयुष्याला पूर्णत्व होतं, जे की आता नाहीये. मला माहितेय, आता जेव्हा काहीतरी ओळख मिळतेय तर त्याची कॉलर किती ताठ असती. या क्षेत्रात काम करण्यासाठी त्याने एकट्याने मला खूप पाठिंबा दिला होता. त्याचा विश्वास होता की ही मुलगी करून दाखवणार. ती तिची ओळख निर्माण करणार आणि मला ओळख मिळवून देणार. आज ते कुठेतरी होतंय तर तो या जगात नाहीये.” पुढे बोलताना तन्वीने म्हटले, “बाबाला अरे-तुरे करणं हे आमच्या खानदानात कोणी केलं नाहीये. कुडाळसारख्या ठिकाणची मी मुलगी आहे. जशी मी थोडी मोठी होत होते, तर काही नातेवाईक वडिलांना म्हणायचे की, अरे तुला अरेच म्हणते, लहान होती तेव्हा ठीक होतं; आता तिने अहो-जाहो म्हटलं पाहिजे.



## लोकप्रिय टीव्ही अभिनेत्रीने खरेदी केली आलिशान मर्सिडीज कार

गौहर खान ही हिंदी टेलिव्हिजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री आहे. अनेक मालिकांमध्ये काम करून तिने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. गौहर खानचा चाहता वर्ग मोठा असून ती सोशल मीडियावरही प्रचंड सक्रिय असल्याचं पाहायला मिळतं. नुकतंच तिने चाहत्यांबरोबर एक आनंदाची बातमी शेअर केली आहे.

# हॉलीवूड सिनेमा ‘मुसाफा’ची बॉक्स ऑफिसवर दहशत, ‘पुष्पा 2’ समोर असतानाही दमदार कमाई

बॅरी जेनकिन्स दिग्दर्शित लायन किंग फिल्म युनिव्हर्सचा सिक्वेल असलेला ‘मुफासा: द लायन किंग’ (Mufasa The Lion King ) हा चित्रपट ‘वनवास’ सोबत २० डिसेंबर रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. मुसाफाची ही कहाणी सध्या प्रेक्षकांच्याही पसंतीस उतरत असल्याचं चित्र सध्या बॉक्स ऑफिसवर आहे. त्यामुळेच पुष्पा २ (Pushpa २) आणि वनवास सारखे दाक्षिणात्य आणि बॉलिवूड चित्रपट असूनही पहिल्याच दिवशी या चित्रपटाने चांगली सुरुवात केली.

चित्रपटाच्या दुसऱ्या दिवसाच्या कमाईशी संबंधित सुरुवातीचे आकडेही समोर आले आहेत. या आकड्यांवरुन हा सिनेमा भारतात चांगली कमाई करेल असं चित्र सध्या बॉक्स ऑफिसवर आहे. Sack-nilkच्या वृत्तानुसार, मुसाफाने भारतात पहिल्या दिवशी इंग्रजी, हिंदी, तमिळ आणि तेलगूमध्ये ८.८ कोटी रुपयांची कमाई





केली.दुसऱ्या दिवशी रात्री १०.१५ वाजेपर्यंत चित्रपटाने १३.५४ कोटींची कमाई केली आहे. चित्रपटाचे एकूण कलेक्शन २२.३४ कोटी रुपये झाले आहे.

वनवासला टाकलं मागे, पुष्पा २ सोबत शर्यत

गदर आणि गदर २ चे दिग्दर्शक अनिल शर्मा यांनी नाना पाटेकर आणि उत्कर्ष शर्मा यांच्यासोबत वनवास बनवला आहे, जो मुफासासोबत रिलीज झाला आहे. वनवासची ओपनिंग फक्त ६० लाख रुपये होती, तर दुसऱ्या दिवशीही चित्रपटाची कमाई जेमतेम १ कोटींवर पोहोचली. तर हॉलिवूड चित्रपट ‘मुफासा’ने यापेक्षा कितीतरी अधिक कमाई केली आहे. पुष्पा २ ने १००० कोटींचा टप्पा ओलांडला आहे आणि अजूनही सिनेमागृहांत हा चित्रपट आहे. एवढ्या मोठ्या ब्लॉकबस्टरसमोरही मुफासाच्या कमाईत कोणतीही घट झालेली नाही. दोघांच्या रोजच्या कमाईत फक्त थोडा फरक आहे.

शाहरुख खान आणि त्याची दोन्ही मुलं अबराम खान आणि आर्यन खान यांनी चित्रपटातील महत्त्वाच्या पात्रांना आपला आवाज दिला आहे. शाहरुखने मुफासाला आवाज दिला आहे आणि अबराम खानने कब मुफासाला आवाज दिला आहे. मुफासाचा मुलगा सिम्बाचा आवाज बनून मुलगा आर्यनने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत.

# गुजरातमध्ये पोहोचली प्राजक्ता माळी, ‘तो’ संकल्प करतेय पूर्ण

ग्लॅमरसच्या जगाशी संबंधित असलेल्या स्टार्सचा अध्यात्माशीही खोल संबंध आहे. अनेक सेलिब्रिटी जीवनातील कोणताही महत्त्वाचा निर्णय किंवा काम करण्यापूर्वी ते आपल्या गुरूचे किंवा देवाचे नाव घ्यायला विसरत नाहीत. अशीच आहे मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी. गुरु, देव, अध्यात्म यावर अभिनेत्रीचा प्रचंड विश्वास आहे. सध्या प्राजक्ता १२ ज्योतिर्लिंगाच्या यात्रेवर आहे. सोशल मीडियाद्वारे तिनं ही माहिती शेअर केली.

आपल्या अभिनयानं आणि सौंदर्यानं चाहत्यांचे मनोरंजन करणाऱ्या प्राजक्तानं २०२३ मध्ये १२ ज्योतिर्लिंगाची यात्रा करण्याचा संकल्प केला होता. तो संकल्प सध्या ती टप्प्याटप्प्याने पुर्ण करतेय. नुकतंच अभिनेत्री गुजरातमध्ये पोहचली. गुजरातमधील श्री सोमनाथ आणि श्री नागेश्वर या दोन ज्योतिर्लिंगांचे दर्शन तिनं घेतलं. याचे फोटो तिनं सोशल मीडियावर शेअर केले



आहेत. एकाच दिवसात तिनं दोन ज्योतिर्लिंगांचे आशीर्वाद घेतले. यासोबतच तिनं द्वारकेतील कृष्णमंदिरातील द्वारकाधीशाचे दर्शन घेतलं.

प्राजक्ताच्या वर्कफ्रंटबाबत बोलायचं झालं तर ती अलीकडेच ‘फुलवंती’ या मराठी सिनेमात दिसली होती. विशेष म्हणजे या सिनेमात ती अभिनेत्री असण्यासोबतच निर्मितीही होती. यात तिच्याबरोबर गश्मीर महाजनी मुख्य भूमिकेत होता. हा चित्रपट हिट झाला असून तो प्राइम व्हिडीओ या ओटीटी प्लॅटफॉर्मवरही प्रदर्शित झाला आहे.

# दिलजीत दोसांझने एपी ढिल्लनच्या आरोपांना दिले उत्तर; ब्लॉक प्रकरणावर स्पष्टीकरण देत गायक म्हणाला...

गायक आणि अभिनेता दिलजीत दोसांझ आणि गायक-रॅपर एपी ढिल्लन यांच्यातील वाद सध्या चांगलाच चर्चेत आहे. एपी ढिल्लनने चंदीगडमधील त्याच्या कॉन्सर्टमध्ये दिलजीत दोसांझला, “इन्स्टाग्रामवरून आधी अनब्लॉक कर, मग बोल,” असे विधान केले. यापूर्वी दिलजीतने त्याच्या इंदोर कॉन्सर्टमध्ये एपी ढिल्लन आणि करन औज या दोघांना शुभेच्छा दिल्या होत्या. दिलजीतच्या ‘दिल-ल्यूमिनाटी इंडिया टूर’ च्या इंदोर कॉन्सर्टमध्ये दिलजीतने सांगितले, “माझ्या दोन भावांनी टूर सुरू केला आहे, करन औजला आणि एपी ढिल्लन.



त्यांना शुभेच्छा!”

मात्र, चंदीगडमधील शोमध्ये एपी शोमध्ये ढिल्लनने त्याच्यात आणि दिलजीतमध्ये अप्रत्यक्षपणे वाद असल्याचे सूचित केले. तो म्हणाला, “भाऊ, एक छोटी गोष्ट सांगायची आहे, आधी मला इन्स्टाग्रामवर अनब्लॉक कर, मग बोल.बाकी काय मार्केटिंग होत आहे हे मला माहिती नाही. पण मी तीन वर्षांपासून मेहनत करत आहे. तुम्ही कधी मला कोणत्याही वादात अडकताना पाहिले आहे का?” दिलजीत दोसांजने एपी ढिल्लनच्या आरोपांना इन्स्टाग्रामवर त्वरित उत्तर दिले. दिलजीत दोसांजने इन्स्टाग्रामवर त्वरित उत्तर दिले. त्याने पंजाबीमध्ये लिहिले, “मी तुला कधीच ब्लॉक केले नाही.माझे सरकारशी पंगे होऊ शकतात, कलाकारांशी नाही.” एपी ढिल्लनने दिलजीतने त्याला ब्लॉक केल्यावरचा एक व्हिडीओ आणि ब्लॉक लिस्टमधून काढल्यानंतरचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केले आहेत. त्यानंतर एपी ढिल्लनने त्याची बाजू मांडण्यासाठी एक स्टोरी इन्स्टाग्रामवर टाकली आहे.

दिलजीतने नुकताच ‘दिल-ल्यूमिनाटी इंडिया टूर’हा दौरा संपवला. त्याच्या हा दौरा काहीसा वादग्रस्त ठरला. तेलंगणामध्ये दिलजीतला गाण्यात मद्य, ड्रग्स किंवा हिंसेला प्रोत्साहन देणाऱ्या गाण्यांवर बंदी घालण्याचे आदेश देण्यात आले होते. त्याचप्रमाणे, चंदीगडमधील त्याच्या कार्यक्रमासाठी आवाज मर्यादा उल्लंघनाबद्दल आयोजकांना नोटीस मिळाली. चंदीगड इव्हेंटदरम्यान दिलजीतने भारतातील कॉन्सर्टच्या सोयीसुविधांवर नाराजी व्यक्त केली आणि म्हणाला, “योग्य सुविधा नसतील, तर मी पुन्हा देशात परफॉर्म करणार नाही.” दरम्यान, एपी ढिल्लनने चंदीगडमध्ये ‘द ब्राउनप्रिंट टूर’संपवला.

# लहानपणी मुलाच्या भूमिका का साकारल्या? ‘मिसमॅच्ड’ फेम अहसास चन्नाचा मोठा खुलासा

अभिनेत्री अहसास चन्ना ‘मिस्डमॅच- ३’ या वेब सीरिजमुळे सध्या चर्चेत आहे. बालकलाकार म्हणून अभिनय क्षेत्रात पदार्पण करून अभिनेत्रीने इंडस्ट्रीत स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. ‘वास्तूशास्त्र’ या चित्रपटाच्या माध्यमातून अहसासने तिच्या फिल्मी करिअरची सुरूवात केली. त्यानंतर तिने ‘कभी अलविदा न कहना’, ‘माय फ्रेंड गणेशा’, ‘वास्तूशास्त्र’ यांसारख्या चित्रपटांमध्ये बालकलाकाराच्या भूमिका साकारल्या. दरम्यान नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत अहसासने बालकलाकार म्हणून चित्रपटांमध्ये मुलाच्या भूमिका का साकारल्या? याबद्दल तिने खुलासा केला आहे.

नुकतीच अहसास चन्नाने ‘बॉलिवूड बबल’ला मुलाखत दिली. या



मुलाखतीमध्ये तिने मुलाच्या भूमिका साकारण्यामागचं कारणही सांगितलं. त्यादरम्यान मुलाखतीत अभिनेत्री म्हणाली की, “मुलाच्या भूमिका मी जाणीवपूर्वक केल्या नव्हत्या तर परिस्थितीमुळे मला त्या भूमिका कराव्या लागल्या. जेव्हा मी चार वर्षांची होते तेव्हा माझ्या आईने ‘वास्तूशास्त्र’ चित्रपटामध्ये एका मुलाची भूमिका करण्यासाठी मला प्रोत्साहन दिलं. त्यावेळी तो चित्रपट हिट झाला. त्यानंतर मला इंडस्ट्रीत लोक ओळखू लागले. मग मी ‘कभी अलविदा ना कहना’ मध्ये काम केलं.” परंतु मुलाच्या भूमिकेसाठी आपले केस लहानच ठेवण्यात यावे, असा आग्रह त्यावेळी इंडस्ट्रीकडून आला होता आणि त्याचा मानसिक आरोग्यावर झाला असंही तिने म्हटलं आहे. पुढे अभिनेत्री सांगितलं, “मुलांच्या भूमिकेने मी कधीच प्रभावित झाले नाही. मला माहिती होतं की तो एक माझ्या अभिनयाचा भाग आहे. अगदी कमी वयातच शाळा आणि अभिनय या दोन्ही गोष्टींना समतोल मी राखला.





**मेष** – एखाद्या क्षुल्लक गोष्टीसाठी अडून राहू नका. आवडत्या गोष्टीत रमून जाल. नवीन मित्र जोडले जातील. कर्तृत्वाला वाव मिळेल.

**वृषभ** - घरगुती जबाबदारी उत्तमरीत्या पेलाल. अनाठायी खर्च होऊ शकतो. कामात क्षुल्लक अडथळे येतील. वरिष्ठांची मदत घ्या.

**मिथुन** – नातलगांच्या मदतीला जावे लागेल. कल्पनेत रमून जाऊ नका. खर्च होईल. महत्त्वाची वस्तू नीट जागेवर ठेवा. काम वाढेल.

**कर्क** – वाटाघाटीत यश मिळेल. कल्पनाशक्ती वाढेल. संगीत कलेत विशेष मन रमेल. नातेवाईकांची नाराजी दूर करावी लागेल.

**सिंह** – जोडीदाराचा वरचष्मा राहील. ठरवलेले काम वेगाने पूर्ण कराल. अपेक्षित व्यक्ती भेटेल. प्रतिष्ठा वाढवणारी घटना घडेल.

**कन्या** – जुने स्नेही भेटतील. जीवनसाथीच्या मदतीने कठीण काम पूर्ण करता येईल. संपर्कातील लोकांशी घनिष्ठता वाढेल.

**तूळ** – घरगुती वातावरण प्रसन्न राहील. जास्त कामाची जबाबदारी येऊ शकते. दुर्लक्ष करू नका. छोटीशी चूकही महागात पडेल.

**वृश्चिक** – विरोधक मैत्री करण्यास येतील. कामातून समाधान लाभेल. आपल्या हाताखालील लोकांचे उत्तम सहकार्य मिळेल.

**धनु** – धंद्यात जम बसेल. कोर्टकेस जिंकाल. कला-क्रीडा स्पर्धेत चमकाल. आपली तब्येत सांभाळा. कृतीला अधिक महत्त्व द्यावे.

**मकर** – मान-प्रतिष्ठा वाढवणारी घटना घडेल. नवे परिचय उत्साहवर्धक ठरतील. आततायीपणे वागू नका. कामाची योग्य दिशा ठरवा.

**कुंभ** – महत्त्वाचे काम करून घ्या. भागीदारीत मतभेद संभवतात. कोर्टाच्या कामात प्रगती होईल. धंद्यात काम मिळवा. वसुली होईल.

**मीन** – खंबीरपणे प्रश्न सोडवाल. तुमचे मत पटवून देता येईल. विचारांच्या गर्दीत भरकटू नका. कौटुंबिक सौख्याला प्राधान्य द्याल.



## मुंबई गोवा महामार्गावर धावत्या बसला आग, सुदैवाने सर्व ३४ प्रवासी बचावले

अलिबाग (दिगंबर जाधव) : मुंबई गोवा महामार्गावर कोलाड इथे खाजगी प्रवासी बस जळून खाक झाली. रात्री १२ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. सुदैवाने यात कुठलीही जीवीत हानी झाली नाही. मात्र बससह प्रवाशांचे सर्व सामान जळून खाक झाले. धाटाव एमआयडीसी, दीपक नायट्रेट कंपनी यांचे अग्नीशमन दल, कोलाड रेस्क्यू टीम आणि पोलीस यांनी बचाव कार्य केले व आगीवर नियंत्रण आणले. बसमध्ये चालक आणि क्लिनरसह ३४ प्रवासी होते. खापरोबा ट्रॅव्हल्सची ही एसी स्लीपर कोच बस मुंबईतील जोगेश्वरी येथून मालवणकडे निघाली होती. कोलाड रेल्वे पुलाजवळ आली असता बसच्या मागील बाजूस मोठा आवाज झाला. तेव्हां ड्रायव्हरने गाडी थांबवून पाहिले असता बसने मागील बाजूस पेट घेतल्याचे दिसले. तातडीने बसमधील सर्व प्रवाशांना खाली उतरवण्यात आले. त्यानंतर आगीचा भडका उडाला.

# एसटी बसची नासधूस; सोलापुरात दोघांना अटक

**सोलापूर (विशाल पाटील): परभणीच्या घटनेपाठोपाठ केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी केलेल्या कथित आक्षेपार्ह विधानाचे पडसाद सोलापुरात उमटत आहेत. त्यातून निषेध आंदोलनाचे सत्र सुरू असताना अक्कलकोट रस्त्यावर एक एसटी बस लोखंडी रॉड आणि हातोड्याने फोडण्यात आली. याप्रकरणी दोघा संशयितांना पोलिसांनी अटक केली आहे.**

पुण्यातील स्वारगेटहून अक्कलकोटला प्रवासी घेऊन निघालेली एक एसटी बस (एमएच १४ केक्यू १०६४) सोलापूरमार्गे अक्कलकोटच्या दिशेने जात असताना वाटेत कुंभारी येथे अज्ञात तरुणांनी अमित शहा यांच्या निषेधार्थ घोषणा देत ही बस अडविली. बसमधील सर्व ३५ प्रवाशांना बळजबरीने खाली उतरविले. चालकाच्या ताब्यातील चावी बळजबरीने



घेऊन बस चालवून पुढे उड्डाणपुलाखाली नेली. हातोडा आणि लोखंडी रॉडने हल्ला करून बसची नासधूस केली. यात दोन लाख रुपयांचे नुकसान झाले असल्याची बसचालक चंद्रकांत ज्ञानबा चौधरी यांनी वळसंग पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच वळसंग पोलीस ठाण्यात एक पोलीस कुंभारी येथे घटनास्थळी धावून आले. परंतु तोपर्यंत हल्लेखोर तरुण पळून गेले होते. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार याप्रकरणी राहुल उर्फ गोट्या निकंबे आणि अक्षय कोंडीबा निकंबे (दोघे रा. कुंभारी) यांना अटक करण्यात आली आहे.

सोलापुरात गेल्या चार-पाच दिवसांपासून परभणी घटनेच्या पार्श्वभूमीवर तीन एस्टी बसवर दगडफेकीचे प्रकार घडले असून सोलापूर मध्यवर्ती एस्टी बस आगारात थांबलेली एक शिवशाही बस जाळण्यात आली होती.

SPORT

## Yashasvi Jaiswal IN, Jasprit Bumrah Captain; 4 Indians Included: Best Test Match Playing XI Of 2024

New Delhi - The 2024 calendar year is coming to a close, and it has been a great year for Test Cricket, especially with teams battling it out to play the final of the World Test Championship 2025. Now, with only two India vs Australia matches left before the year to end, we look at the best playing XI for the entire 2024 calendar year, featuring the best performers with both bat and ball. A total of five Indians make the list, with a surprising name as captain of the team. Yashasvi Jaiswal has been the breakout star of 2024. He is the second highest Test run-getter of 2024, with 1312 runs, includi-



ng 3 hundreds and 7 fifties. These also include two double centuries. In fact, Jaiswal smashed the record of being the player with the number of sixes in a calendar year in Test matches (35). England's Ben Duckett will be Jaiswal's opening partner, as he is the third-highest run-getter of 2024 with 1149 runs. The two will form an explosive opening duo

Joe Root will come in to bat at no.3. He has been the best batter of 2024 by a mile, amassing 1556 runs including 6 centuries and five fifties. Harry Brook, had a phenomenal year as well with 1107 runs including the only triple century of 2024. He will follow root at 4. Kamindu Mendis of Sri Lanka too had a phenomenal breakout year scoring 1049 runs in 9 matches at an average of 74.92.

Travis Head will come into bat at no.6. He might have scored just 607 runs, but the impact he has had in the lower order with a strike rate of over 86 proves that he was a major asset for Australia as they stand top in the WTC points table.

The Indian spin bowling all-rounder duo of Ravichandran Ashwin and Ravindra Jadeja will be the two all-rounders in the side. Jadeja has scored 508 runs, including 1 century and three fifties, in addition to taking 44 wickets. Ravichandran Ashwin has taken 47 wickets n 2024, and also scored 310 runs with the bat. In fact Ashwin recently retired from all forms of international cricket. Jasprit Bumrah will not only lead the bowling attack but will also captain the side. He has taken 62 wickets in 2024 and is the leading-wicket taker in Tests this year. He will be partnered in the pace bowling department by England's Gus Atkinson and New Zealand's Matt Henry who have taken 52 and 49 wickets respectively Best Test Match Playing XI For 2024: Yashasvi Jaiswal, Ben Duckett (wk), Joe Root, Harry Brook, Kamindu Mendis, Travis Head, Ravindra Jadeja, Ravichandran Ashwin, Gus Atkinson, Jasprit Bumrah (c), and Matt Henry.

## Brazilian teen Joao Fonseca aims to win Next Gen ATP Finals in Jeddah

New Delhi -Brazilian teenager Joao Fonseca is competing in the Next Gen ATP Finals against American Learner Tien on Sunday. An 18-year-old Fonseca hopes to emulate his role model, world number one Jannik Sinner, who won the tournament in 2019.

The Jeddah event offers $2.05 million in prize money for players aged 20 and under. A win would make Fonseca the second-youngest champion after Sinner. Fonseca served as Sinner's hitting partner at last year's ATP Finals. He credits the Italian for encouraging his move to professional tennis.

"It would be amazing to replicate Sinner," Fonseca said. "It shows I'm on the right track and would be special."

Fonseca could take home $526,480 as the unbeaten champion. He expressed confidence in his performance this week.

"I'm playing a high level. I'm just proud of myself and the way I've been with my routine this week, so focused," he said. "With my family here, with my three coaches, it's really nice and I hope I can go for the title."

Tien, 19, has significantly improved his ranking this season, rising to 122 from outside the top 450. This final marks the second meeting between the two players.

"I'm happy with where my game is at," Tien said. "The crowd has been great all week and it's always great to play in these environments."

This is the second year the hardcourt tournament is hosted in Saudi Arabia. The event, previously held in Milan, aims to showcase rising tennis stars. Past winners include Carlos Alcaraz and Stefanos Tsitsipas, now successful senior players. The tournament features an innovative format: best of five sets, with each set first to four games.



## Ben Stokes Ruled Out Of Champions Trophy As Joe Root Returns To England's ODI Squad



England Test skipper Ben Stokes has been all but ruled out from the 2025 Champions Trophy, which will be held in Pakistan, and also from the white-ball series against India as the ECB announced the squads on Sunday. Stokes didn't make it to the team for the of these series as he had sustained a left hamstring injury in the third Test match against New Zealand.

Stokes didn't even bat during the second innings in an attempt to help the team that suffered a batting collapse as they lost the match by 423 runs, despite winning the three-match series by 2-1.

Since England would be hosting India for a five-match Test series in June next year and then the highly-awaited Ashes Test series, the team management didn't want to take any risk since Stokes is also the Test skipper. But, star Joe Root, who was England's former Test skipper, would be making a comeback to the ODI team after a long time since the 2023 ODI World Cup. Pacer Mark Wood, who wasn't part of the Test series against Pakistan and New Zealand, owing to a right elbow injury, is included in both teams.

## Rohit Sharma Injured Ahead Of Boxing Day Test? Akash Deep Provides Major Update On Indian Skipper

New Delhi - India vs Australia 4th Test: India captain Rohit Sharma took a blow to his left knee, while Akash Deep hurt his hand at the nets but the pacer allayed any injury concerns ahead of the fourth Test against Australia, starting here from December 26.

Both players were struck while facing throwdowns in the outdoor practice arena in order to prepare for the Boxing Day Test match at the Melbourne Cricket Ground and were seen in some discomfort.



After batting for a while, Rohit received medical attention from the team physio. He sat for some time with his leg stretched on a chair, icing the knee, before walking off gingerly. While there has been no official update on his condition, Akash, who got hit on his hand, said both were routine net injuries. "Such blows are common when you play cricket. I think this (practice pitch) wicket was for the white ball which is why the ball was kept low at times. "But these blows are common in training. There are no major concerns because of that," Akash said in a press conference. The 37-year-old Rohit, who missed the series opener at Perth to spend time with his newborn son, has struggled with form.

Batting down the order rather than opening at Adelaide and Brisbane, Rohit has managed scores of 3, 6, 10. He decided to bat at the unusual no.6 position after KL Rahul impressed as opener alongside Yashasvi Jaiswal.

On Saturday, opener KL Rahul also had a blow on his hand while batting at the nets. After the Brisbane Test ended in a draw, the Indian skipper Rohit accepted that his batting has not been at its best lately but said he does "feel good" about his game. "I have not batted well. There's no harm in accepting that. But I know what's in my mind, how I'm preparing myself. All those boxes are very much ticked. It's just about spending as much time as possible, which I'm pretty sure I'm just there," Rohit said in the post-match press conference after the drawn Test at the Gabba.

## India captain Niki elated after historic Asia Cup win: Bowlers did a fantastic job

New Delhi - Skipper Niki Prasad admitted that India were around 20 runs short in their Under-19 Women's Asia Cup 2024 final against Bangladesh. But she also heaped praise on the bowlers for defending a low total as India became the champions of the inaugural edition after winning the match by 41 runs at the Bayuemas Oval in Kuala Lumpur.

After being asked to bat first, all India could manage was 117 for seven on the back of Gongadi Trisha's half-century and a 17-run cameo from Mithila Vinod. Thereafter, Aayushi Shukla picked up three wickets as India bowled their opponents out for 76 in 18.3 overs.

Prasad, who will play for the Delhi Capitals (DC) in the upcoming Women's Premier League (WPL), said that staying calm under pressure has helped the Indian team in the tournament.

"We felt we were a few runs short, maybe




20 runs short, but scoring 117 on this wicket is good. But we knew that we had a good bowling side and would bowl well. We were trying to stay in the game, have that intent, body language and our bowlers and fielders did a fantastic job," Prasad said in the post-match presentation ceremony. "The first thing is that all of us are very calm in the dressing room and so, that brings a lot of confidence. When the batters are batting and things are not going in our side, it doesn't matter as we are calm and that's why we got to that score," Prasad said. Niki lauded Trisha for scoring 52 runs off 47 balls while opening the batting. She also hailed Trisha as India's "mystery bowler" after the latter bowled three overs for 10 runs.

"The way G Trisha has batted, it was fabulous. I liked the approach we had, and we batted really well. She is also our mystery bowler, and she bowled really well," Prasad added.

After becoming the champions of Asia, India are set to defend their title in the Under-19 Women's T20 World Cup to be held in Malaysia from January 18 to February 2.

कोल्हापूर विभागाची 'व्हाय नॉट?' महाराष्ट्राची लोकांकिका

# रत्नागिरी विभागाच्या 'मशाल'ला द्वितीय तर पुण्याच्या 'सखा'ला तृतीय पारितोषिक

**● मुंबई, विशाल कारंडे :**

युवा रंगकर्मींच्या दर्जेदार सादरीकरणाला रसिक प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद आणि अरे. . . आवाज कुणाचा अशा आरोळ्यांनी दणाणलेले नाट्यगृह, उत्कृष्ट सादरकरण आणि विषय वैविध्य यांनी नटलेल्या लोकसत्ता लोकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीत यंदा कोल्हापूर विभागाने आपली मोहोर उमटवली आहे. सर्वोत्कृष्ट लेखक, दिग्दर्शक, अभिनय या वैयक्तिक पारितोषिकांसह राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'व्हाय नॉट?' या एकांकिकेने महाराष्ट्राची लोकांकिका होण्याचा बहुमान पटकावला.

देवगड येथील श्री. स. ह .केळकर महाविद्यालयाची 'मशाल' या एकांकिकेने द्वितीय तर पुण्यातील आयएमसीसी महाविद्यालयाची 'सखा' या एकांकिकेने तृतीय पारितोषिक पटकावले. युवा रंगकर्मींच्या सळसळत्या उत्साहात आणि मनोरंजनसृष्टीतील दिग्गज मंडळींच्या उपस्थितीत महाअंतिम फेरी शनिवार, २१ डिसेंबर रोजी माटुंगा येथील यशवंत नाट्य मंदिर येथे रंगली.




युवा रंगकर्मींमधील कल्पनाशक्तीला चालना देण्यासाठी आणि त्यांना कलाक्षेत्रातील व्यावसायिक संधींची कवाडे खुली करून देणाऱ्या 'लोकसत्ता लोकांकिका' या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन मराठी एकांकिका स्पर्धेबाबत नाट्यप्रेमींमध्ये सुरुवातीपासूनच उत्साह पाहायला मिळत आहे. यंदा युवा रंगकर्मींचा उत्साह वाढवण्यासाठी आणि त्यांच्या रंगमंचीय आविष्काराला दाद देण्यासाठी महाअंतिम फेरीसाठी सुप्रसिद्ध अभिनेते पंकज त्रिपाठी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अष्टपैलू अभिनयाच्या जोरावर मनोरंजनसृष्टी गाजवणारे दिवंगत अभिनेते अतुल परचुरे यांना महाअंतिम फेरी सुरू होण्यापूर्वी श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर परीक्षकांसह जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणचे अध्यक्ष उन्मेष वाघ, सॉफ्ट कॉर्नरचे दिलीप कुलकर्णी, आयरिस प्रोडक्शन्सचे विद्याधर पाठारे आणि लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर यांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन करून महाअंतिम फेरीची जल्लोषात सुरुवात झाली. मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, कोल्हापूर आणि रत्नागिरी या आठही विभागांतील एकांकिकांची वैविध्यपूर्ण पर्वणी एकाच ठिकाणी अनुभवण्यासाठी रसिकप्रेक्षकांनी सकाळी सात वाजल्यापासूनच यशवंत नाट्य मंदिराबाहेर गर्दी केली होती.

दर्जेदार एकांकिका सादरीकरणाला रसिकप्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद देत नाट्यगृह दणाणून सोडले होते. तर निवेदक कुणाल रेगे यांनी आपल्या अनोख्या शैलीत सूत्रसंचालन करीत स्पर्धकांसह रसिकप्रेक्षकांचा उत्साह वाढवला.

व्हाय नॉट, मशाल, सखा यांबरोबरच मुंबई विभागातून सिडनहॅम महाविद्यालयाची 'अविघ्नेयाह्ण, ठाणे विभागातून सतीश प्रधान, ज्ञानसाधना महाविद्यालयाची 'कुक्कुरह्ण, नागपूर विभागातून वसंतराव नाईक महाविद्यालयाची 'पासपोर्टह्ण, नाशिक विभागातून नूतन मराठा विद्यालयाची 'सुबन्या आणि..., छत्रपती संभाजीनगर विभागातून देवगिरी महाविद्यालयाची 'फाटा' या आठ एकांकिकांचे महाअंतिम फेरीत सादरीकरण झाले. प्रसिद्ध अभिनेते वैभव मांगले, अभिनेत्री व निर्माती मुक्ता बर्वे आणि लेखक व दिग्दर्शक क्षितीज पटवर्धन यांनी महाअंतिम फेरीच्या परीक्षणाची धुरा सांभाळली. 'मराठी माणसाच्या जगण्याचा नाटक हा अविभाज्य घटक आहे. विंगेत उभे राहून जो गर्भार अंधार असतो, त्यातून निर्माण होणारी नाट्यनिर्मिती आपण अनुभवत असतो. राज्याच्या विविध भागातील युवा रंगकर्मी हे वैविध्यपूर्ण विषयांवर आधारित नावीन्यपूर्ण कलाकृती 'लोकसत्ता लोकांकिका' या स्पर्धेच्या मंचावर सादर करत असतात आणि महाअंतिम फेरी म्हणजे एक ऊर्जा देणारा दिवस असतो. या स्पर्धेला मनोरंजनसृष्टीतील दिग्गज मंडळी हजेरी लावतात आणि युवा रंगकर्मींना मार्गदर्शनही करतात', असे मत लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर यांनी प्रास्ताविक मांडताना व्यक्त केले.



## कॅबिनेट मंत्री नामदार आदिती तटकरे यांना पून्हा महिला व बालविकास खाते, लाडकी बहिणींमध्ये उत्साह

**● रोहा, विशाल पाटील :**

रायगड जिल्ह्याच्या श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील नवनिर्वाचित आमदार आदिती ताई तटकरे यांची मंत्रिमंडळ विस्ताराच्या वेळी कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाली होती पण खाते वाटप झाले ना होते पण काल दिनांक २१/१२/२०२४ शनिवार रोजी मंत्रिमंडळातील खाते वाटप करण्यात आले त्यात कॅबिनेट मंत्री नामदार आदिती ताई तटकरे यांना पुन्हा महिला व बालविकास मंत्रीपद मिळाला म्हणून राज्यासह रायगड जिल्ह्यातील विशेष करून श्रीवर्धन मतदारसंघातील लाडकी बहिणींच्या आशा पल्लवित होवुन त्यांच्यात उत्साहाचे वातावरण आहे. दिर्घ काळ प्रतिक्षेत नंतर राज्य मंत्रिमंडळाचे विस्तार झाले आणि सत्तापक्षाने सुट्टकेचा निश्वास सोडला दिनांक २१/१२/२०२४ शनिवार रोजी मंत्रिमंडळाचा विस्तार झाला त्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानी गृह, उर्जा, कायदा आणि सुव्यवस्था खाते आपल्या जवळ ठेवत माजी मुख्यमंत्री व नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नगरविकास, गृहनिर्माण, खाते मिळाले तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अर्थ, आणि राज्य उत्पादन खाते मिळाले आहेत तसेच अन्य राज्य मंत्रीपद देण्यात आले आहेत.

## भारतीय प्रशासन सेवेत दाखल झालेल्या २३ अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**● मुंबई, यश सावंत :**

राज्य सरकारच्या सेवेतून भारतीय प्रशासकीय सेवेत (आयएएस) दाखल झालेल्या २३ अधिकाऱ्यांना नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. अमरावती विभागाचे उपायुक्त संजय पवार यांची चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी (सीईओ) नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे संचालक नंदू बेडसे यांची छत्रपती संभाजीनगर येथे अल्पसंख्याक विकास अयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

उपसभापती नीलम गोऱ्हे यांचे खासगी सचिव रवींद्र खेबुडकर यांची नियुक्ती मंत्रालयात अल्पसंख्याक विकास विभागाचे उपसचिवपदी करण्यात आली आहे. नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेले निलेश सागर हे राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारीपदी, तर लक्ष्मण भिका राऊत हे बालहक्क सुरक्षा आयोगाचे सचिव झाले आहेत. कल्याण-डोंबिवलीच्या स्मार्ट शहराच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी माधुरी सरदेशमुख



यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. ज्योत्स्ना पडियार यांची अर्थ व सांख्यिकी आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. रत्नागिरीच्या जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारीपदी अण्णासाहेब चव्हाण, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी गोपीचंद कदम, हाफकीन महामंडळाच्या व्यस्थापकीय संचालकपदी महेश आव्हाड, तर राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदी वैदेही रानडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बापू पवार यांची पाणीपुरवठा विभागात सहसचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

## हवाई प्रवाशांना खुशखबर ! पुण्यातून थेट आंतरराष्ट्रीय विमानसेवेत वाढ

**● पुणे, अभिजीत येरल्लू :**

पुण्याहून देशांतर्गतसह आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत विमान उड्डाणांमध्ये आता आणखी वाढ झाली आहे. पुण्यातून बँकॉकसाठी थेट विमानसेवा नोव्हेंबरमध्ये सुरू झाली होती. यात आता आणखी एका आंतरराष्ट्रीय उड्डाणाची भर पडली आहे. यामुळे पुण्यातून होणाऱ्या आंतरराष्ट्रीय उड्डाणांची संख्या आता पाच झाली आहे.

पुणे विमानतळाने हिवाळी वेळापत्रकात या नवीन आंतरराष्ट्रीय उड्डाणांचे नियोजन केले होते. इंडिगो एअरलाइन्सने पुण्याहून बँकॉकसाठी थेट




विमानसेवा गेल्या महिन्यात सुरू केली. याचबरोबर इंडिगोनेच पुणे ते दुबई थेट विमानसेवा सुरू केली आहे. आता एअर इंडिया एक्स्प्रेसने पुणे – बँकाक थेट विमानसेवा सुरु केली आहे. याचबरोबर एअर इंडिया एक्स्प्रेसने पुण्यातून मंगळुरूसाठी थेट विमानसेवा सुरु करण्याची घोषणाही केली आहे.

एअर इंडिया एक्सप्रेसची पुणे बँकॉक सेवा गुरुवार शुक्रवार शनिवारी असेल. हे विमान पुण्यातून सकाळी ८.४० वाजता उड्डाण करेल आणि दुपारी २.३० वाजता बँकॉकमध्ये पोहोचेल. हे विमान बँकॉकमधून दुपारी ३.३५ वाजता उड्डाण करेल आणि पुण्यात सायंकाळी सहा ६.२५ वाजता पोहोचेल. याचबरोबर एअर इंडिया एक्सप्रेस पुणे मंगळूर ही थेट विमानसेवा ४ जानेवारीपासून सुरू करीत आहे. या मार्गावर दर शनिवारी दोन विमान फेऱ्या होणार आहेत. आता पुण्यातून सिंगापूर, दुबई आणि बँकॉकसाठी थेट आंतरराष्ट्रीय विमानसेवेत आणखी वाढ झाली आहे. इंडिगेची पुण्यातून दुबईसाठी दररोज विमानसेवा सुरू आहे. हे विमान पुण्यातून सायंकाळी ५.४० वाजता निघून दुबईला रात्री १०.१० वाजता पोहोचते. दुबईतून हे विमान रात्री १२.१५ मिनिटांनी सुटते. इंडिगोची पुण्यातून बँकॉकसाठी आठवड्यातून तीन दिवस बुधवारी, शुक्रवारी आणि शनिवारी थेट विमानसेवा सुरू आहे.

### तीन आंतरराष्ट्रीय ठिकाणी थेट उड्डाण


पुण्यातून आधी स्पाईसजेटकडून सिंगापूर आणि एअर इंडियाकडून (आधीची विस्तारा) दुबईसाठी थेट विमानसेवा सुरू होती. त्यात दुबईसाठी आणखी एक आणि बँकॉकसाठी दोन विमानांची भर पडली आहे. यामुळे पुणे तीन आंतरराष्ट्रीय ठिकाणांशी हवाई मार्गाने थेट जोडले गेले आहे. याचवेळी पुणे विमानतळावरील आंतरराष्ट्रीय उड्डाणांची संख्या पाचवर पोहोचली आहे.

## कंटेनर कारवर पलटी होऊन घडली दुर्दैवी घटना ; एकाच कुटुंबातील सहा जणांचा भीषण अपघातात मृत्यू

**● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :**

देशभरात दररोज अपघाताच्या अनेक घटना घडताना पाहायला मिळातात. आता बंगळुरुमधील नेलमंगळा तालुक्यातील बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात झाल्याची घटना शनिवारी सकाळी ११ वाजताच्या दरम्यान घडली. या अपघातात एकाच कुटुंबातील ६ जणांचा मृत्यू झाला आहे. मृत कुटुंब हे सांगलीच्या जत तालुक्यातील मोरबगी गावचे होते अशी माहिती सांगितली जाते. एकाच कुटुंबातील ६ जणांचा मृत्यू झाल्यामुळे मोरबगी गावावर शोककळा पसरली आहे.

हे कुटुंब ख्रिसमसच्या सुट्टी निमित्ताने बेंगळुरूवरून जतकडे आपल्या गावी जात होते. मात्र, गावाकडे जात असताना एक कंटेनर त्यांच्या चारचाकी गाडीवर अचानक पलटी झाल्यामुळे एका आयटी



इंजिनिअरसह ६ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. यामध्ये चंद्रम इप्पाळगोळ, त्यांची पत्नी गौराबाई (४० वर्षे), त्यांची मुले ज्ञान (१६ वर्षे) आणि दीक्षा (१० वर्षे), त्यांची मेहुणी विजयालक्ष्मी (३५ वर्षे) आणि त्यांची भाची आर्या (६ वर्षे) अशी मृतांची नावे आहेत. चंद्रम इप्पाळगोळ हे मूळ सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील मोरबागी गावाचे रहिवासी होते. चंद्रम इप्पाळगोळ हे बंगळुरू येथे एका सॉफ्टवेअर कंपनीत सीईओ होते. त्यांचे कुटुंब देखील त्यांच्याबरोबर बेंगळुरू येथे राहत होते. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

बेंगळुरू ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चंद्रम इप्पाळगोळ आणि त्याचे कुटुंब कर्नाटकच्या विजयपुरा जिल्ह्याच्या सीमेला लागून असलेल्या महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील मोरबागी येथील त्यांच्या गावी जात होते. ते त्यांच्या आजारी वडिलांना भेटायला आणि ख्रिसमस सुट्टीनिमित्त जात होते. मात्र, एक भरधाव कंटेनर ट्रक त्याच्या गाडीवर येऊन पलटी झाला. चंद्रम इप्पाळगोळ यांनी दोन महिन्यांपूर्वीच चारचाकी गाडी खरेदी केली होती.

## माथेरान मध्ये अवैध धंदे तेजीत

**● माथेरान, भावना जैन:**




पर्यटनस्थळ माथेरान मध्ये मागील काही वर्षांपासून अवैध धंदे तेजीत दिसत आहेत. याबाबत कुणाच्याही तक्रारी येत नसल्याने मटका आणि ऑनलाइन रेसेस खेळण्यासाठी युवा वर्गाची झुंबड पडत आहे. यामध्ये नियमितपणे लाखो रुपयांची उलाढाल होत असते. त्यामुळे हे जुगार खेळण्यासाठी अनेकजण कर्जबाजारी झाले आहेत. तर काही जणांनी सावकारांकडून दहा टक्के व्याजाने पैसे काढून ह्या जुगारात लावले होते. हा कर्जाचा अवाढव्य डोंगर फेडता येत नसल्यामुळे काहीजण गाव सोडून सुध्दा गेले होते.शेवटी त्यांना मित्र मंडळींनी आधार देऊन माघारी आणल्याचे बोलले जात आहे. काही कर्जबाजारीपणाला कंटाळून गाव सोडून कुठेही भूमिगत होत असल्याने त्यांच्या पालकांमध्ये एकप्रकारे भीतीचे वातावरण निर्माण होत आहे.असे प्रकार नेहमीच घडताना दिसत आहे.गावाच्या वस्तीच्या ठिकाणी हे अवैध धंदे जोमाने सुरू आहेत. काही महिलांनी याबाबत माहिती दिली आहे.

## डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा तर्फे स्वच्छता अभियान

**अलिबाग ते रेवदंडा ६८किमी रस्ता सफाई : ४४टन कचरा गोळा**

**● अलिबाग, दिगंबर जाधव :**

अलिबाग स्वच्छता व सामाजिक उपक्रम राबवून लोकांना विविध सेवा मिळवून देण्याचे सामाजिक कार्य डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा तर्फे केले जाते. आरोग्य, स्वच्छता बरोबरच स्मशानभूमि स्वच्छता मोहिम हाती घेण्यात आली असून, त्यासोबत मुस्लिम समाजातील कब्रस्थानांची स्वच्छता करुन मानवता धर्माचे जतन करण्यात आले आहे. समाजातातील प्रत्येक व्यक्तीला स्वच्छतेचे महत्व कळावे व त्यांच्यात जनजागृती व्हावी या उद्देशाने भारत देशाचे स्वच्छता दूत, पयत्री, महाष्ट्रभूषण डॉ. श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी व आदरणीय डॉ. श्री.



सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग तालुक्यांतील रेवदंडा ते अलिबाग मुख्य रस्त्याचे दुतर्फा स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

## थंडीला लागणार 'ब्रेक', हवामान खात्याचा पावसाचा अंदाज

**● नागपूर, नितीन देवळेकर :**

**राज्यात डिसेंबरच्या पूर्वार्धात कडाक्याची थंडी पडली. राज्यातील अनेक शहरांमध्ये किमान तापमानाचा पारा चार ते पाच अंश सेल्सिअसवर पोहचला. गोठवणाऱ्या थंडीमुळे ठिकठिकाणी शेकोट्या पेटलेल्या दिसून येत होत्या, पण आता या थंडीचा जोर काहीसा ओसरत चालला आहे. राज्यातील किमान तापमानात वाढ झाली आहे आणि आता हवामान खात्याने चक्क पावसाची शक्यता वर्तवली आहे.**

राज्यात नुकतेच नागपूर येथे हिवाळी अधिवेशन पार पडले. अधिवेशनाची सुरुवातच कडाक्याच्या थंडीने झाली. त्यामुळे या थंडीची सवय नसलेल्या आणि राज्यातून वेगवेगळ्या भागातून आलेल्या राजकीय, शासकीय व्यक्तींना ही थंडी चांगलीच बाधली. अधिवेशनाच्या पूर्व संध्येला नागपुरात सात अंश सेल्सिअस इतके किमान तापमान नोंदवले गेले. तीन ते चार दिवस थंडीचा जोर कायम होता, तर अधिवेशन संपताना अखेरचे दोन दिवस हा जोर काहीसा ओसरला. आता हवामान खात्याने हा जोर आणखी ओसरणार असून



पावसाची शक्यता वर्तवली आहे.

बंगालच्या उपसागरात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा येत्या काही तासात पुढे सरकणार असून पूर्व-इशान्येकडे दाब वाढणार आहे. परिणामी इशान्येकडील राज्यांमध्ये पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे. याचाच परिणाम महाराष्ट्राच्या तापमानावर होणार असून पुढील दोन दिवसात राज्यात काही भागात पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. किमान तापमानात वाढ झाली असून विदर्भात येत्या २४ व २५ डिसेंबरला हलक्या ते मध्यम सरींची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मराठवाडा, मध्य महाराष्ट्रातही आर्द्रता वाढणार असून काही भागात वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता कडाक्याच्या थंडीला "ब्रेक" मिळणार असून तापमानात काहीशी वाढ होणार असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे.

गेल्या काही दिवसात हाडे गोठवणारी थंडी होती. त्यावेळी चार ते पाच अंश सेल्सिअस वर असणारे किमान तापमान आता ११ ते १५ अंश सेल्सिअसवर पोहचले आहे. राज्यातील काही भागात गारठा कायम असला तरी कमाल तापमानात वाढ झाली आहे. राज्यात किमान तापमानात वाढ झाली असून तापमानाचा पारा काहीसा वाढलाय. मुंबईत कुलाबा आणि सांताक्रूझमध्ये किमान तापमान २० अंशांवर गेले. नाशिक येथेही १२ ते १८ अंश सेल्सिअसवर होते.